केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

Volume - 75 | Issue- 42 | Marathi Daily | Monday 5/10/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3



उपवासाची कारणे अनेक,
शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196



उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{₹999/-* दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर}
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
अशी संधी पुन्हा नाही. आजच संधीचा लाभ घ्या.
1gm ते 10gm मंगळसुत्र 10% मजुरीत सूट
30gm चे मंगळसुत्र 30% मजुरीत सूट
40gm चे मंगळसुत्र 40% मजुरीत सूट
60gm चे मंगळसुत्र 60% मजुरीत सूट
80gm चे मंगळसुत्र 80% मजुरीत सूट
100gm चे मंगळसुत्र 100% मजुरीत सूट
योजनेचे नियम : 1) सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*


## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




...आणि विशेष म्हणजे या मुलीने त्या टी.व्ही.वरच्या 'सासू-सुनांच्या भांडणाच्या' मालिका अजिबात पाहिलेल्या नाहीयत!...तुमच्या घरात चांगला संसार करील ती !!

### उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय, कार्यकर्त्यांना दुप्पट ताकदीने लढण्याचा निर्धार

# सभापती राम शिंदे यांची जिल्हा बँकेतून माघार

**समाचार/नगर-दि.५**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असतानाच विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला. आपल्या उमेदवारी अर्जावरून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम देत, राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा घटनात्मक पदाची प्रतिष्ठा सर्वोच्च आहे, असे स्पष्ट करत त्यांनी आपण अर्ज दाखल करणार नसल्याचे जाहीर केले. हा निर्णय जाहीर करताना कार्यकर्त्यांसमोर सभापती प्रा. राम शिंदे भावुक झाले. सभागृहात उपस्थित कार्यकर्त्यांमध्येही यावेळी भावनिक वातावरण निर्माण झाले.

कर्जत-जामखेडमधील प्रमुख पदाधिकारी, जिल्हा बँकेचे मतदार आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सभापती प्रा. राम शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. कर्जत तालुक्यातील बारडगाव सुद्रिक आणि जामखेड तालुक्यातील दिसलेवाडी या दोन संस्थांच्या माध्यमातून आपले ठराव झाले होते. विशेष म्हणजे दोन्ही ठराव बिनविरोध झाले. उपसभापती डॉ. गावडे आणि कृषी उत्पन्न



बाजार समितीचे संचालक डॉ. गणेश जगताप यांनी पुढाकार घेत कार्यकर्त्यांच्या माध्यमातून हे ठराव केले, असे सांगत सभापती शिंदे यांनी कर्जत-जामखेडच्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले. एका व्यक्तीचा दोन तालुक्यांत ठराव होण्याची ही बँकेच्या इतिहासातील पहिलीच वेळ असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, कायद्याचे धडे आम्हालाच देणाऱ्यांनी आधी स्वतःच्या कारभाराकडे पाहावे, असा टोला लगावत सभापती शिंदे यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावेळी त्यांनी मागील निवडणुकांतील काही उदाहरणांचा दाखला देत नियमांच्या अंमलबजावणीबाबत दुहेरी निकष लावले जात असल्याचा आरोप केला.

(पान ३ वर)

### निवडणूक बिनविरोधच्या दिशेने?

**विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज जिल्हा बँक निवडणुकीतून माघार घेण्याची धक्कादायक घोषणा केली. सभापती शिंदे यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, आता ही निवडणूक बिनविरोधच्या दिशेने असल्याचे चित्र आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडेच आता जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडणुकीची संपूर्ण सुत्रे राहण्याची शक्यता आहे. सभापती शिंदे यांच्या माघारीमुळे आता कर्जत- जामखेडसह जिल्ह्यातील पुढील जागांचे गणित कसे असणार, याकडे लक्ष लागले आहे.**

## निवडक

### एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर



**मुंबई, दि.५-** महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाच्या घडामोडी सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज, ५ ऑक्टोबर रोजी दिल्ली दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट होण्याची शक्यता असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबतही चर्चा होऊ शकते. मात्र, भेटीचा अंतिम अधिकृत कार्यक्रम अद्याप स्पष्ट झालेला नाही.शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याची वेळ महाराष्ट्रातील आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरत आहे. महायुतीमध्ये काही जागांवर उमेदवारी आणि जागावाटपावरून मतभेद समोर आले आहेत. त्यामुळे दिल्लीतील बैठकीत या प्रश्नांवर चर्चा होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी आणि एकनाथ शिंदे यांच्या संभाव्य भेटीत महाराष्ट्राशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.विशेषतः पुणे शिक्षक मतदारसंघावरून भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेत मतभेद निर्माण झाले आहेत. भाजपने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे, तर शिवसेनेकडून मंगेश चिवटे निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही शिवसेनेचा पुणे जागेवरील दावा कायम असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्यात या जागेचा प्रश्न चर्चेला येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### पुणे पदवीधर - शिक्षक मतदारसंघात महायुतीत संघर्ष?

# विरोधी आघाडीत काँग्रेसच्या विरोधात ठाकरेसेना रिंगणात!

**समाचार/मुंबई-दि.५**

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या ५ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीपाठोपाठ विरोधी महाविकास आघाडीतही मित्रपक्ष आमने सामने येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महायुतीत भाजपाने पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातून उमेदवार जाहीर केले असताना मित्रपक्ष शिंदेसेना आणि राष्ट्रवादीचे इच्छुक उमेदवारही निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी करत आहेत. त्यामुळे पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात महायुतीत संघर्ष होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दुसरीकडे या निवडणुकीसाठी विरोधी महाविकास आघाडीतही जागावाटपावरून घमासान सुरू आहे. काँग्रेसने पुणे, संभाजीनगर पदवीधर तसेच अमरावती शिक्षक मतदारसंघात उमेदवार जाहीर केले. आता मित्रपक्ष ठाकरेसेनेनेही संभाजीनगर आणि अमरावती मतदारसंघात आज आपले उमेदवार जाहीर करून खळबळ उडवून दिली. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघात आघाडीत काँग्रेस आणि ठाकरेसेना आमने सामने ठाकली आहे . या परिस्थितीत पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघात महायुती आणि संभाजीनगर आणि अमरावती मतदारसंघात विरोधी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा तिढा कसा सुटणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

विधानपरिषदेच्या पुणे, नागपूर, संभाजीनगर पदवीधर आणि पुणे व अमरावती शिक्षक मतदारसंघाची निवडणूक येत्या २३ ऑक्टोबर रोजी होत आहे. या निवडणुकीसाठी राज्यातील सत्ताधारी महायुतीत भाजपा ५ पैकी ३ जागा लढविणार असून मित्रपक्ष शिंदेसेना आणि राष्ट्रवादीच्या वाट्याला प्रत्येकी एक जागा आली आहे. त्यामध्ये राष्ट्रवादीला संभाजीनगर पदवीधरची तर शिंदेसेनेला अमरावती शिक्षक मतदारसंघाची जागा दिली गेली आहे. त्यानंतर भाजपाने आपले तिन्ही उमेदवार जाहीर केले. मात्र पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या जागेवरून महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. या दोन्ही जागांसाठी मित्रपक्ष शिंदेसेना आणि राष्ट्रवादीच्या इच्छुकांनी जोरदार तयारी चालविली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातून शिंदेसेनेचे मंगेश चिवटे तर पुणे पदवीधर मतदारंघात राष्ट्रवादीचे

(पान ३ वर)

## पोटच्या मुलाला जीवे ठार मारले ; आई-वडिलांना पोलिसांकडून अटक



**समाचार/नगर-दि.५**

रोज दारू पिऊन त्रास देत असल्याच्या कारणावरून डोक्यात लाकडी दांडक्याने मारून पोटच्या मुलास जिवे ठार मारले. ही घटना गुणवडी (ता. नगर) येथे घडली. या घटनेतील आई-वडिल आरोपींना नगर तालुका पोलिसांनी अटक केली आहे. प्रकाश लांडगे आणि आशा लांडगे अशी आरोपींची नावे आहेत, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारूळे यांनी दिली.प्रकाश विनायक लांडगे, आशा प्रकाश लांडगे यांचा मुलगा प्रवीण प्रकाश लांडगे (वय २५, रा. गुणवडी, ता. जि. नगर) हा रोज दारू पिऊन येऊन त्रास देत असल्याच्या कारणावरून दि.२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास प्रकाश लांडगे याने प्रवीणच्या डोक्यात लाकडी दांडक्याने मारून जिवे ठार मारले तसेच प्रकाश लांडगे व आशा लांडगे या दोघांनी मिळून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने गुणवडी गावच्या शिवारात शेतात नेऊन मृतदेह जाळून टाकला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस स्टेशन येथे बीएनएस कलम १०३ (१), २३८,३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती सपोनि वारूळे यांनी दिली. घटनास्थळाहून पोलिसांनी मयताची हाडे, हातातील अंगठ्या, कडे हस्तगत केले. सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे, पोहेकॉ आबासाहेब झावरे, शरद वांढेकर, मंगेश खरमाळे, राहुल थोरात, विक्रांत भालसिंग यांनी ही कारवाई केली.

## सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला बजावली नोटीस

### एसआयआर प्रकरण तापले



**नवी दिल्ली, दि.५-** केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि त्यांनी घेतलेल्या एकतर्फी निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत केंद्रीय निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाला नोटीस बजावत उत्तर मागितले आहे.



सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध सुप्रीम कोर्टात दाखल झालेल्या याचिकांवर आज मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. वरिष्ठ वकिल विकास सिंह यांनी कोर्टात बाजू मांडताना जोरदार युक्तीवाद केला. कुठल्याही संवैधानिक प्राधिकरणपेक्षा सध्या मुख्य निवडणूक आयुक्त बलवान आहेत असे ते म्हणाले. १९९० साली असे नव्हते. २०२३ मध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांना बलवान बनवण्यात आले. आज प्रत्येक भारतीय नागरिकामध्ये

(पान ३ वर)

## प्रवासात कोयत्याच्या धाकाने कार पळविणारी टोळी जेरबंद

**समाचार/नगर-दि.५**

उबेर गाडी बुक करून प्रवासात कोयत्याचा धाक दाखवून कार पळविणाऱ्या टोळीस स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे.बदलापूर (जि.ठाणे) येथून ३ आरोपींना ताब्यात घेत ११,७१,२०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी सोपान गोविंद दंडगुले (वय ३६, रा. दिघी, पुणे) हे उबेर कंपनीकडून मिळालेले भाडे घेऊन नाशिक येथून शिर्डीकडे जात होते.त्यावेळी गाडीमधील बसलेल्या तीन इसमांनी कोयत्याचा धाक दाखवून त्यांचे तोंड, डोळे, हात, पाय बांधुन वांबोरी, राहुरी येथे आणून, त्यांना गाडीमधुन ढकलून त्यांची इरटिगा कार व मोबाईल जबरीने घेऊन गेले. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदिप दरवडे, पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, विशाल तनपुरे, भगवान सानप, सतीष भवर, फुरकान शेख, प्रशांत राठोड, भगवान धुळे यांच्या पथकाने आरोपींना शोध घेतला.

(पान ३ वर)


नगरकरांची पहिली पसंत...
जामगांवकर सिल्क अॅण्ड सारीज्
फॅशनच्या दुनियेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
आम्हाला कर्मचारी पाहिजेत..!
साडी विभाग सेल्समन पगार ₹ 16,000 ते ₹ 22,000 — 5
हेल्पर (साडी विभाग) पगार ₹ 12,000 ते ₹ 17,000 — 5
लेडीज हेल्पर (साडी विभाग) — 5
सेल्स गर्ल (साडी काऊंटर) — 5
जेन्ट्स आणि रेडीमेड विभाग सेल्समन पगार ₹ 16,000 ते ₹ 20,000 — 5
आकर्षक पगार व इन्सेन्टिव्ह मिळेल.
गंजबाजार, अहिल्यानगर.
99222 95376
0241-2341930


# दिशान गांधी याच्या 'दिल्ली धुरंधर' संघाला अजिंक्यपद




**समाचार/नगर-दि.५**

देशातील पहिल्याच आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असलेल्या कॉर्फबॉल प्रिमिअम लीग स्पर्धेत अहिल्यानगरच्या दिशान किशोर गांधी याचा सहभाग असलेल्या दिल्ली धुरंधर संघाने अजिंक्यपद मिळवले.

दिल्लीतील त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये सलग १६ दिवस चाललेल्या या स्पर्धेत ८ संघांनी सहभाग नोंदवला. यात देशातील दर्जेदार खेळाडूंसह आंतरराष्ट्रीय खेळाडू असे तब्बल ११६ खेळाडू सहभागी झाले होते.दिशानच्या दिल्ली धुरंधर संघाने

### कॉर्फबॉल प्रिमिअम लीग स्पर्धा

उत्कृष्ट सांघिक खेळ करत सलग ७ सामने जिंकले. प्रत्येक सामन्यात दिशानने भक्कम डिफेन्स केला. त्याचा भक्कम बचाव भेदता न आल्याने विरोधी संघाला फारसे गोल करता आले नाहीत. अंतिम सामन्यातही त्याचे समयसूचक आक्रमण आणि संरक्षण दिल्ली धुरंधरच्या विजयात सिंहाचा वाटा उचलणारे ठरले. संपूर्ण स्पर्धेत दिशानच्या खेळाचे तज्ज्ञांनी, खेळाडूंनी तसेच प्रेक्षकांनी कौतुक केले. दिशानला या खेळात खूप चांगले भवितव्य असल्याचे सर्वांनी आवर्जून नमूद केले. मुले व मुली यांचा एकत्र सहभाग असलेल्या कॉर्फबॉल खेळाची लोकप्रियता या स्पर्धेमुळे देशभरात शिगेला पोहोचली आहे. प्रसिद्ध अभिनेते मनोज तिवारी यांच्या हस्ते विजयी संघाला ट्रॉफी व ३१ लाख रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया, स्पोर्टी भारत आणि गेम चेंजर्स यांनी स्पर्धेचे यशस्वी नियोजन केले. दिशानने देशाच्या राजधानीत अहिल्यानगरचा डंका वाजवला आहे. याआधी त्याने आशिया ओशियान स्पर्धा, विश्वचषक स्पर्धाही गाजवल्या आहेत.

संपादकीय

# ऑपरेशन ज्ञानेशकुमारच्या निमित्ताने...

नुकतीच २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांची जयंती झाली. या दिवसाचे स्मरण अवघा देश स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महात्म्याच्या स्मृती जागवून करतो. नेमक्या याच सुमारास मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात विरोधी पक्ष आणि संघटना यांनी आंदोलनाला सुरुवात केली. केंद्र सरकारचे बाहुले म्हणून कारभार करत असल्याचा आरोप ज्ञानेशकुमार यांच्यावर होत आहेत. विरोधी पक्ष संपवण्यासाठी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांचा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त आपल्या पदाचा गैरवापर करत असून केंद्र सरकारला पाहिजे ते निवडणूक आयोगाच्या माध्यमातून साध्य केले जात आहे. जनतेमध्ये नाराजी असतानाही लागोपाठ पार पडणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपाचे उमेदवार निवडून येत आहेत. गेली काही वर्षे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी निवडणुकीत व्होट चोरी झाल्याचा आरोप सातत्याने करत आहेत. मात्र सुखबीरसिंग संधू व विवेक जोशी या दोन निवडणूक आयुक्तांनीच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मनमानी, पक्षपाती आणि एकतर्फी कारभारावर वारंवार आक्षेप घेतल्याचे उघडकीस आल्याने ज्ञानेशकुमार हे संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मतदार पुनर्रचना नोंदणी (एसआयआर) मध्ये देशातील तेरा कोटी मतदारांची नावे वगळण्यात आल्याने आयोगाविरोधात रस्त्यावर असंतोष प्रकटला आहे. 'ज्ञानेशकुमार हटाव' अशी मोहीम देशभर सुरू आहे. ज्ञानेशकुमार यांना अटक करा, ज्ञानेशकुमार यांना जेलमध्ये पाठवा अशा घोषणांचे फलक फडकू लागले आहेत, दोन्ही निवडणूक आयुक्तांनी दहा महिन्यांमध्ये घेतलेल्या चौदा आक्षेपांबाबत आयोगाची भूमिका काय आहे किंवा व्होटचोरीचा आरोप होत असताना आयोगाचे म्हणणे काय आहे, हे सांगण्यासाठी स्वत: ज्ञानेशकुमार पुढे आले नाहीत. त्यातूनच गांधीजयंतीच्या मुहुर्तावर कॉक्रोच जनता पार्टी तसेच अन्य राजकीय पक्ष आंदोलनाला सुरुवात केली. निवडणूक आयोगाच्या मदतीमुळेच भाजपा केंद्र आणि अन्य राज्यांमध्ये सत्ता काबीज करतो असे गंभीर आरोप होत आहेत. दया, कुछ तो गडबड है, अशी आम जनतेत उघड चर्चा ऐकायला मिळत आहे. दरम्यान, निवडणूक आयुक्तांवर गुन्हा दाखल करता येणार नाही, खटला भरता येणार नाही किंवा अटक होऊ शकत नाही, असा कायदाच केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये संसदेत मंजूर केला. त्यावेळी लोकसभेत काही बेरोजगार तरूणांनी गॅलरीतून सभागृहामध्ये उड्या मारून गोंधळ निर्माण केला होता. हे तरूण कोण होते, ते आतमध्ये कसे आले, संसदेची सुरक्षा व्यवस्था काय करते अशा प्रश्नांद्वारे विरोधकांनी तेव्हाही कामकाज रोखून धरले होते. लोकसभेचे अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला आणि सभापती जगदीप धनखड यांनी लोकसभा आणि राज्यसभा मिळून विरोधी पक्षाच्या १४६ खासदारांना निलंबित केले होते. विरोधकांची पुरेशी संख्या नसताना सरकारने निवडणूक आयुक्तांना कायदेशीर संरक्षण देण्याचा कायदा संमत करून घेतला. मुख्य निवडणूक आयुक्तांवर गुन्हाच दाखल करता येणार नसेल तर त्यांना अटक कशी होईल आणि जेलमध्ये कसे पाठवता येईल, असे प्रश्न या निमित्ताने समोर आले. म्हणूनच राहुल गांधी त्यांना राजीनामा देऊन माफीचे साक्षीदार व्हा, असे आवाहन करताना दिसले. ज्ञानेशकुमार यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. केंद्रीय गृहसचिव, सहकार सचिव ते मुख्य निवडणूक आयुक्त अशी त्यांची वाटचाल आहे. निवृत्तीनंतर लगेचच निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची मार्च २०२४ मध्ये नेमणूक झाली आणि दुसऱ्याच दिवशी लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले. वर्षभरात ते मुख्य निवडणूक आयुक्त झाले. जम्मू काश्मीर पुनर्रचना विधेयकाचा मसुदा तयार होत असताना ते गृह मंत्रालयात जबाबदारीच्या पदावर होते. पूर्वी निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीच्या समितीवर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक केलेली होती, सरकारने कायदा करून त्यांना हटवले आणि त्यांच्या जागी एक केंद्रीय मंत्री असेल, अशी तरतूद केली. वास्तवात केंद्रीय मंत्री पंतप्रधानांच्या मनाविरूध्द मत मांडणे शक्य तरी आहे का, याचा विचार या ठिकाणी केला गेला नाही. आज कोट्यवधी रूपये खर्च करून मतदार पुनर्रचना यादी तयार केली जात आहे. एसआयआरमधून किती घुसखोर बांगलादेशी सापडले, कितीजणांना परत पाठवले असे प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्रात दोन कोटी मतदार बाद झाले आहेत. आधार कार्ड, रेशन कार्ड आणि निवडणूक ओळखपत्र असताना, गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदान केले असताना मतदारांचे नाव बाद का व्हावे? विशेष म्हणजे भाजपाचे संस्थापक लालकृष्ण अडवाणी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचीही नावे यादीतून गायब आहेत. इंडियन एक्सप्रेसच्या दिल्लीतील पत्रकार रितिका चोप्रा यांनी निवडणूक आयोगाच्या कारभाराचे पितळ उघडे पाडून भूकंप घडवला. त्यांच्या शोधपत्रकारितेने मीडियाला नवे खाद्य दिले. तीनही निवडणूक आयुक्तांना समान अधिकार असताना दोन आयुक्तांचे आक्षेप धाब्यावर बसवून आणि अंधारात ठेवून मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार कसा मनमानी आणि सरकारधार्जिणा कारभार करत आहेत, याची कथित पोलखोल रितिका यांनी केली. सोशल मीडिया आणि सामान्य जनतेतून रितिकावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे. यापूर्वी सुचेता दलाल (हर्षद मेहता प्रकरण), तनुश्री पांडे (हाथरस अत्याचार व हत्या), ग्रीष्मा कुठार (मणिपूर असंतोष), ज्योती यादव (कोविडकाळात स्थलांतरितांचे झालेले हाल), पूनम अग्रवाल (इव्हीएम घोटाळा), सुकन्या शांता (भारतीय तुरुंगातील दुरवस्था), जतिंदर कौर (लष्करातील भ्रष्टाचार) अशा महिला पत्रकारांनी शोधपत्रकारितेत लौकिक कमावला आहे. सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्षांना जमले नाही, ते या महिला पत्रकारांनी करून दाखवले. आता जबाबदारी वास्तव तपासण्याची आहे. ते सध्या सुरु असलेल्या जनाआंदोलनांना जमेल का?

# भाऊसाहेब सुद्रिक राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



**समाचार/नगर-दि.५**

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या विविध स्तरांमध्ये प्रेरणादायी कार्य करणारे माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब सुद्रिक यांना लोकपरिवर्तनच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असताना सुद्रिक यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव, तसेच व्यक्तीमत्व विकासाला विशेष महत्व दिले. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान न राहाता विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून त्यांनी सातत्याने कार्य केले. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग घेत समाजहिताला प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अशोक सुर्यवंशी, चेअरमन लालासाहेब सुद्रिक, झुंबर सुद्रिक, सरपंच सतिष सुद्रिक, एपीआय वैभव महागंरे, इंजि. अकाश सुर्यवंशी, इलाहिबक्ष मनियार, प्रवीण सुद्रिक, पेमराज सुद्रिक, उद्योजक प्रकाश निमसे, मुख्याध्यापक कल्याण सुद्रिक आदी मान्यवर उपस्थित होते.

## लुटीसाठी वापरलेली दुचाकी केली हस्तगत

**समाचार/नगर-दि.५**

शहातील गजबजलेल्या अजंठा चौक परिसरात ६२ वर्षीय दीपक येळाई यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करुन १ लाखांची चोरी झाली होती. या गुन्ह्यासाठी वापरलेली दुचाकी पाथर्डी शिवारातील डोंगराळ भागातून जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दीपक येळाई हे गुरुवारी (दि.१) दुपारी प्लॉट विक्रीतून मिळालेले ९ लाख रुपये घेऊन जाताना दोन दुचाकीवर आलेल्या चौघांनी त्यांच्यावर हल्ला केला. येळाई यांनी प्रतिकार केला असता, आरोपींनी त्यांच्यावर वार करुन पैशांची बॅग हिसकावून पलायन केले होते.

## कलाकारांसाठी उद्या ऑडिशन

**समाचार/नगर-दि.५**

सन इन्डीया फिल्म प्रस्तुत ऑडीशन एक वेड एक स्वप्न मायकल जॅक्सन'' या मराठी व हिंदी चित्रपटासाठी २० ते ५० वयोगटातील कलाकारांचे ऑडीशन घेण्यात येणार आहे व त्यांना आमंत्रित करण्यात येणार आहे.

मागील यशस्वी चित्रपटानंतर 'लग्नाचे वळू' व 'ब्रह्मान्डनायक' तसेच 'मुंबई मेरी बाहो में' या चित्रपटात शक्ती कपूर, रजा मुराद, मकरंद अनासपुरे, अलका कुबल व इतर हिंदी व मराठी कलाकारांनी काम केले आहे व मराठी सह्याद्रिची सिरीयल 'आनंद महिमा' तसेच हिंदी सिरियल 'मै बनुंगी मिस इन्डीया' या नावाची सिरीयल लखनवू दुरदर्शनवर चाललेली यशस्वी सिरियल या यशस्वी प्रोडक्शननंतर एक वेड एक स्वप्न मायकल जॅक्सन'' हा चित्रपट म्युझिकल व डान्सींगवर आहे. त्यात एका डान्सर मुलाची कहाणी व त्याच्या जीवनावर आधारीत आहे. विशेषतः डान्सर मुला-मुलींना जास्तीत जास्त प्राधान्य दिले जाईल. वरील चित्रपटाचे शुटींग पुणे येथे होणार आहे. आहे या चित्रिकरणाचा शुभारंभ भारत गणेशपुरे, चला हवा येऊ द्या फेम यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसेच मराठी सिरियल बायकोचा बैल'' या वेब सिरीजसाठी जास्तीत जास्त विनोदी कलाकार व मुले-व मुलीना संधी देण्यात येणार आहे. या दोन्ही चित्रपटासाठी अहिल्यानगरमधील कलाकारांना जास्तीत-जास्त प्राधान्य देण्यात येणार आहे.

ऑडीशन उद्या मंगळवारी, दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ ते ४ माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन येथे होणार आहे.

## ज्ञानसंपदा शाळेत 'स्वच्छतेचा संस्कार'





**समाचार/नगर-दि.५**

ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६-२७ निमित्त तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ८.४५ वाजता आयोजित या उपक्रमात एकूण १७९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे छोटे-छोटे गट तयार करून त्यांना परिसरनिहाय स्वच्छतेची जबाबदारी देण्यात आली. रामकृष्ण मठ परिसर, शिवमंदिर परिसर व मूकबधिर विद्यालय परिसर तसेच शाळेचा परिसर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी हातमोजे व कचरा संकलनाच्या पिशव्यांचा वापर करून परिसरातील कचरा गोळा केला.

यावेळी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य संकलन व स्वच्छ परिसराचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेशी संवाद साधण्यात आला.

स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.




### राशीभविष्य

- **मेष** : श्री शक्तीदेवीची उपासना करावी. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. कामं मनासारखी होतील.
- **वृषभ** : विद्यार्थ्यांना स्पर्धामध्ये यश मिळेल. नव्या योजना मार्गी लागतील. आर्थिक अडचणीतून मार्ग निघेल.
- **मिथुन** : अपेक्षित कामं मनासारखी होतील. उपजत कला-गुणांचा गौरव होईल. जनसंपर्क वाढता राहील.
- **कर्क** : आर्थिक कामं मनासारखी होतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. महत्त्वाची कामं मार्गी लागतील.
- **सिंह** : उपजत कला-गुणांचा विकास होईल, सरकारी कामं मनासारखी होतील, नव्या ओळखी वाढतील.
- **कन्या** : उत्साहानं कामं यशस्वी होतील. गृहसजावटीच्या व्यवसायात प्रगती होईल. नव्या संधी लाभतील.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. उपजत कला-गुणांचा गौरव होईल.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रशासन सेवेत अधिकार वाढतील.
- **धनु** : नव्या विचारांना चालना मिळणार आहे. गुरूकृपेनं सर्व मनासारखं घडत जाईल. नव्या संधी लाभतील.
- **मकर** : कार्यक्षेत्रात समाधानकारक प्रगती होईल. गुंतवणूक विचारानं करावी. समस्यांबाबत समाधान लाभेल.
- **कुंभ** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. अडचणीतून मार्ग निघेल. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी.
- **मीन** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. व्यवसायात नवे बदल हितकर ठरतील. प्रवास लाभदायक ठरेल.

### ६ ऑक्टोबर — दिन विशेष

**१९४९:** पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या इमारतीची कोनशिला बसवण्यात आली.
**१९६३:** पुणे आकाशवाणी केंद्राचे सांगली हे उपकेंद्र सुरू
**१९७६ :** सी.आय.ए.च्या हस्तकांनी ठेवलेल्या दोन बाँबचा स्फोट होऊन क्युबाना फ्लाइट ४५५ हे विमान ब्रिजटाउन, बार्बाडोस इथे कोसळलं. ७३ ठार.
**२०१३ :** अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून अरुण काकडे यांची निवड.

### आरोग्यमंत्र — फायदे बीटचे...

बीट आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे. हिमोग्लोबिन बनवणं आणि रक्त स्वच्छ करणं यासाठी बीटचा उपयोग होतो. बीटरुटमध्ये भरपूर जीवनसत्त्वं आणि खनिजं आढळतात. तसंच लोह, सोडियम, पोटॅशियम, फॉस्फरस इत्यादी घटकांनी बीट समृद्ध आहे. बीट खाल्ल्यानं उच्च रक्तदाब नियंत्रणात राहतो. रोज सकाळी १ कप बीटचा रस प्यायल्यास किडनी स्टोनची समस्या देखील दूर होते. रोज ३० ग्रॅम बीट खाल्ल्यामुळे लीव्हरची सूज कमी होते. बीट श्वसननलिका स्वच्छ ठेवते.



त्वचा सुधारण्यासाठीही बीट फायदेशीर आहे. हे अँटीएजिंग म्हणून कार्य करते. डागविरहित, चमकदार आणि गुळगुळीत त्वचेसाठी बीटचा रस खूप फायदेशीर आहे. त्यात असलेली ए, सी आणि के ही व्हिटॅमिन्स शरीराची लोह, तांबे आणि पोटॅशियमची आवश्यकता पूर्ण करतात आणि त्वचा निरोगी ठेवते. फाटलेल्या ओठांना बरे करण्यासाठी आणि ते मऊ करण्यासाठी बीटरूटचा रस लाभदायक ठरतो. बीटचा रस फ्रिजमध्ये ठेवून तो दाट झाल्यावर रात्री आपल्या ओठांवर लावला आणि सकाळी आपण मलईच्या मदतीने ओठ स्वच्छ केले तर ओठ मऊमुलायम आणि गुलाबी बनतात. दोन चमचे बीटचा रस आणि मध एकत्र खाल्याने गॅसची समस्या दूर होते. बीटमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असल्याने पोटाशी संबंधिस समस्या दूर होतात. बीट रोज खाल्याने पोटाच्या समस्या दूर होतात. बीटमध्ये असलेलं फॉलिक ॲसिड गर्भवती महिला आणि गर्भात असलेल्या बाळासाठी फायदेशीर असतं.

### कोण होणार? — अंतराळ संशोधक व्हायचंय?

मुलांनो, इस्त्रोमध्ये स्पेस सायंटिस्ट बनण्यासाठी तुम्हाला गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण व्हावं लागेल. यासोबतच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीची प्रवेश परीक्षाही द्यावी लागेल. एअरोस्पेस इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, रेडिओ इंजिनिअरींग आदी शाखांमध्ये पदवी मिळवणारे विद्यार्थी अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात जाऊ शकतात. इस्त्रो अशा गुणवंताच्या शोधात असतं.

मात्र इथे प्रवेश मिळवण्यासाठी तुमच्याकडे प्रचंड हुशारी असायला हवी. इस्त्रो हुशार मुलांचीच निवड करतं. त्याबरोबर अंतराळाची ओढ, उत्सुकता, कल्पकता हे गुणही असायला हवेत. इस्त्रोतर्फे आयसीआरबी परीक्षेचं आयोजन केलं जातं. ही परीक्षा इलेक्ट्रॉनिक, मॅकेनिकल आणि कॉम्प्युटर अशा तीन विभागांमध्ये घेतली जाते. बीई, बीएससी तसंच आयआयटी या विषयात पदवीला ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले विद्यार्थी ही प्रवेश परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेसाठी बरीच तयारी करावी लागते.

### स्किल डेव्हलपमेंट — कसा वाढवायचा संपर्क?

सर्वसाधारणपणे दहा टक्के नोकऱ्यांच्या जाहिराती दिल्या जातात. उर्वरित ९० टक्के नोकऱ्या ओळखीद्वारे, सोशल नेटवर्किंगद्वारे मिळू शकतात. म्हणूनच चांगली नोकरी मिळवण्यासाठी किंवा बढतीसाठी लोकांसोबत कनेक्ट होणं, संवाद वाढवणं गरजेचं आहे.

✻ सर्वात आधी तुमची आवड जाणून घ्या. तुम्हाला कोणत्या क्षेत्रात नोकरी करायची आहे हे ठरवा. मग त्या क्षेत्रातल्या लोकांशी ओळख करून घेण्याचा प्रयत्न करा. सोशल माध्यमांद्वारे संपर्क साधा. ✻ संबंधित क्षेत्रातल्या तज्ज्ञांची निवड केल्यानंतर त्यांच्याशी संपर्क साधण्याचे मार्ग शोधून काढा. विविध संस्था, संघटनांमार्फत तुम्ही त्यांच्याशी संपर्क साधू शकता. ✻ नावाजलेल्या लोकांचे फोन नंबर शोधा. त्यांना फोन करा. ईमेलद्वारेही संपर्क साधता येईल. अशा प्रकारे तुमचं नेटवर्किंग वाढवा. ✻ स्वत:बद्दल काय सांगायचं हे आधीच ठरवून ठेवा. तुमचं शिक्षण, पार्श्वभूमी,कौशल्य या सगळ्याची नीट माहिती घ्या. ✻ तज्ज्ञांना चांगले प्रश्न विचारा. त्यांचा प्रवास, संघर्ष यासह संबंधित क्षेत्रातल्या घडामोडींची माहिती घ्या. ✻ संपर्क साधल्यानंतर थांबू नका. सातत्याने पाठपुरावा करत रहा. तज्ज्ञांना वेळोवेळी संपर्क करा. विशेष प्रसंगी त्यांना शुभेच्छा द्या.

### पंचांग

**मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद कृ. ११, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : आश्लेषा, योग : सिद्ध/साध्य,
सूर्योदय ६.३२, सूर्यास्त ६.२१

### फॉरवर्ड्स

**इस दौर-ए-सियासत क़ा इतना सा फ़साना हैं...**

**बस्ती भीं जलानी हैं औऱ मातम भीं मनाना हैं...!**

### फिटनेस फंडा

✻ एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामप्रकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.

✻ योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात. सूर्यनमस्कार घातल्यानेही शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र शिकता येईल.

### ग्रुमिंग — क्लिन शेव्ह लूकसाठी...

दोस्तांनो, क्लिन शेव्ह लूकमुळे तुमचं व्यक्तिमत्त्व खुलतं. दाढीची खुंट वाढलेल्या चेहऱ्यापेक्षा तुळतुळीत चेहरा मस्त वाटतो. म्हणून बरेचजण दररोज किंवा एक दिवसाआड दाढी करतात. दाढी केल्यानंतर हँडसम दिसत असलात तरी तुमच्या त्वचेची पुरती वाट लागलेली असते. दररोज दाढी करणाऱ्यांची त्वचा रखरखीत, कोरडी झालेली असते. त्यातच दाढीचे केसही राठ होतात. अशा सिथतीत प्री शेव्ह तेलाचा वापर करायला हवा. याच्या लाभांविषयी...

✻ हे तेल फक्त दाढीच्या केसांनाच नाही तर त्वचेलाही ओलावा मिळवून देतं. या तेलामुळे दाढीचे केस मऊ होतात. त्वचा, केस मुलायम असतील तर दाढीही झटपट होऊन जाते. हे तेल दाढी करण्याच्या थोडा वेळ आधी लावून घ्या. ते त्वचेमध्ये चांगलं मुरू द्या. मगच दाढी करा.

✻ दाढीच्या ब्लेडमुळे त्वचेवर थोड्याफार जखमा होतात. या जखमा खूपच त्रासदायक ठरतात. प्री शेव्ह तेलामुळे या जखमांचं प्रमाण कमी होतं. या तेलाने नीट मसाज करून ते पुरेसा वेळ ठेवल्यास त्वचेलगतचे केस थोडे बाहेर येतील. त्यामुळे ब्लेडचा त्वचेशी कमीत कमी संपर्क होऊन जखमांची शक्यताही कमी होईल.

✻ तेल लावण्यात बराच वेळ जाईल हा विचार मनातून काढा. उलट या तेलामुळे कोरडे, राठ केस काढण्याचा वेळ वाचेल. तेलामुळे रेझरही भरभर फिरेल आणि दाढी पटकन होईल.

### खेचाखेची — पर्याय

एकदा एका खिसेकापूला कोर्टात हजर करण्यात आले. न्यायाधीशांनी त्याला सहा महिने जेल किंवा दोन हजार रुपये दंड ठोठावला. तेव्हा खिसेकापूचा वकील म्हणाला, साहेब, माझ्या अशिलाला दंड भरायचा आहे, पण त्याच्याकडे फक्त एक हजार रुपयेच आहेत. तुमची परवानगी असेल तर तो या गर्दीत दहा मिनिटे फिरुन अजून एक हजार रुपये आणू शकेल.

### वेगळं काही

जपानमध्ये एका ६१ वर्षांच्या माणसाने सायकलच्या तब्बल १५९ सीट चोरल्या. टोकियोतल्या 'ओटा वार्ड' भागात गेल्या काही दिवसांपासून सायकलच्या सीट्सची चोरी होऊ लागली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासलं. त्यात एक माणूस सायकलची सीट चोरून नेत असल्याचं दिसलं. पोलिसांनी या माणसाला शोधून काढलं आणि ताब्यात घेऊन आणि सीट चोरण्याचं कारण विचारलं. त्यावर गेल्या वर्षी आपल्या सायकलची सीट कोणीतरी चोरली. मग सायकलही चोरून नेली. याचा बदला घेण्यासाठी आणि सायकलची सीट चोरल्यावर कसं वाटतं याची जाणीव करून देण्यासाठी आपण इतरांच्या सायकलची सीट चोरायला सुरुवात केल्याचं त्याने सांगितलं.

### सौंदर्योपचार — करा अँटी एजिंग हेअरकट्स

सुंदर दिसण्यासाठी स्त्रिया प्रयत्नशील असतात. त्यासाठी विविध सौंदर्योपचारांचा आधार घेतला जातो. परंतु केसांची योग्य स्टाईल करुनही सौंदर्यवर्धन साधता येतं. वय लपवण्याचा हा उत्तम मार्ग ठरतो. तुम्हीही 'अँटी एजिंग' हेअरकट्सविषयी जाणून घ्या आणि वाढतं वय लपवा.



✻ लाँग लेअर्स – पातळ होणाऱ्या केसांना बाऊंसी लूक देणारा हा हेअरकट आहे. यामुळे केसांची घनता वाढलेली दिसते. ✻ मॉडर्न शॅग – आखुड पण दाट केस हवे असणाऱ्यांसाठी ही परफेक्ट हेअरस्टाईल आहे. बरेचदा केस मुळांजवळ जास्त विरळ दिसू लागतात. अशा वेळी मॉडर्न शॅग यंग लूक देण्यास मदत करू शकतो. केस आखुड ठेवले तर बाऊंसी इफेक्ट येतो आणि केसांचा विरळपणा झाकला जातो. ✻ लाँग बॉब – वयाच्या एका टप्प्यावर केसांची मुळं नाजूक होतात. वाढीवरही परिणाम होतो. लाँग बॉब हेअरकट केसांना फुगीरपणा देतो. परिणामी केस दाट दिसू लागतात. या स्टाईलमध्ये केसांचे शेंडे बोथट केले जातात. त्यामुळे केस घनदाट दिसू लागतात. ✻ पिक्सि हेअरकट – आखूड केसांची आवड असणाऱ्यांसाठी हा योग्य पर्याय आहे. केसांची लांबी कमी असल्याने मेंटेन करण्याचा व्याप वाचतो. केस मॅनेजेबल राहतात.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## अर्ज़ किया है...

*समझता हूँ मैं सब कुछ सिर्फ़ समझाना नहीं आता*
*तड़पता हूँ मगर औरों को तड़पाना नहीं आता*

**- अख्तार अन्सारी**

हा शेर अशा माणसाच्या मनःस्थितीचे वर्णन करतो जो संवेदनशील, स्वाभिमानी आणि अंतर्मुख आहे. असा माणूस स्वतः दुःखाचा घोट पितो, स्वतः त्रास सहन करतो, पण बदला घेण्याची किंवा दुसऱ्याला त्रास देण्याची वृत्ती ठेवण्याऐवजी शांत राहणं पसंत करतो. हा शेर व्यक्तीचा अगतिकपणा दर्शवत नसून, तिचा संयम आणि नैतिक मोठेपणा अधोरेखित करतो.



# समाचार

सोमवार दि. ५ ऑक्टोबर २०२६ पान ३


### पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे आदेश

# महावितरण, आरोग्य, पशुसंवर्धन यंत्रणांनी सुविधा द्याव्यात




**समाचार/नगर-दि. ५**

टंचाई निवारणार्थ असणाऱ्या विविध उपाययोजनांसाठी शासन संवेदनशील पद्धतीने विविध विभागांच्या मार्फत नागरिकांना व शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देत आहे. तालुक्यात महावितरणने शेतकऱ्यांना वेळेत वीजपुरवठा करावा, तसेच आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रमध्ये सर्पदंश प्रतिबंधक औषधांची उपलब्धता करून खात्री करावी, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

अकोले येथील टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभव पिचड,अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक,उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी गायसमुद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. उमेश पाटील, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण कार्यालयात बसून न करता संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन करावे. पशुधन लसीकरण, शेतीतील पिकाचे पंचनामे पिक विमा बाबतची कार्यवाही महावितरण मार्फत होणारा अपुऱ्या वीज पुरवठ्यातील अडचणी दूर करून सुरळीतपणा आणण्यासाठी कृषी ,पशुसंवर्धन ,महसूल आणि महावितरण या सर्व विभागाने क्षेत्रभेटी देऊन त्याबाबतचे अहवाल सादर करावेत. केलेल्या कामकाजाचा आढावा प्रत्येक महिन्यात घेतला जाणार असून दोषी आढळणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविषयी निष्काळजी केल्याबाबत निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी उद्या कार्यशाळा

**समाचार/नगर-दि. ५**

जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगरच्या अधिनस्त सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी शासनाच्या महा–उपलब्धी' (Maha-UPLBDHI) मोबाईल ॲपबाबत जनजागृती करण्यासाठी मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय अन्वये निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी दि. १ जुलै २०२६ पासून महा–उपलब्धी' हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध सेवा जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या ॲपचा वापर, उपलब्ध सेवा तसेच निवृत्तीवेतनधारकांना त्याचा होणारा उपयोग याबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक तसेच पेन्शनर्स संघटनांच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून महा–उपलब्धी' ॲपची माहिती करून घ्यावी, असे आवाहन अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन), अहिल्यानगर तुकाराम भाबड आणि जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर जनार्दन सहारे यांनी केले आहे.


## पान १ वरुन


### सभापती राम शिंदे यांची जिल्हा बँकेच्या रणांगणातून माघार

महाराष्ट्र विधान परिषदेचा सभापती म्हणून माझ्यावर असलेल्या घटनात्मक पदाची प्रतिष्ठा आणि निष्पक्षता जपणे ही माझी जबाबदारी आहे. व्यापक परिस्थितीचा शांतपणे विचार केल्यानंतर माझ्या अंतरात्म्याचा आवाज मला उमेदवारी अर्ज दाखल करू नये, असे सांगत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा घटनात्मक पदाची प्रतिष्ठा सर्वोच्च आहे, हा आपल्या निर्णयामागील मूलभूत विचार असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र निवडणुकीतून माघार घेतली असली तरी कर्जत–जामखेडमधील कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माझ्या निवडणुकीपेक्षा मी कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत अधिक वेगाने आणि गतीने काम करतो. जामखेड नगरपालिकेच्या निवडणुकीत ते आपण पाहिले आहे. या निवडणुकीतही माझे पूर्ण लक्ष राहणार असून, उलट दुप्पट गतीने आणि ताकदीने काम करणार आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सभापती राम शिंदे यांच्या या घोषणेनंतर उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील या अनपेक्षित माघारीमुळे आता कर्जत–जामखेडच्या राजकारणासह संपूर्ण जिल्ह्यातील निवडणुकीचे समीकरण कोणते वळण घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### विरोधी आघाडीत काँग्रेसच्या विरोधात ठाकरेसेना रिंगणात!

प्रताप उर्फ भैय्या माने इच्छूक आहे. या दोन्ही इच्छुकांनी निवडणूक लढविण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे महायुतीत संघर्षाची चिन्हे दिसू लागली आहेत.

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या या निवडणुकीत विरोधी महाविकास आघाडीतही जागावाटपावरून संघर्षाची ठिणगी पडली आहे. दोन दिवसांपूर्वी काँग्रेसने आपल्या ३ उमेदवारांची नावे परस्पर जाहीर केल्याने मित्रपक्ष ठाकरेसेना आणि शरद पवार राष्ट्रवादीत नाराजी आहे. याबाबत शनिवारी आघाडीच्या नेत्यांची दुसरी बैठक झाली. मात्र त्यामध्ये जागावाटपाबाबत कुठलाच निर्णय झाला नाही. ठाकरेसेनेने संभाजीनगर पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघावर दावा केला आहे. काँग्रेसने तेथे आधीच उमेदवार जाहीर केले आहेत. दरम्यान आघाडीत जागावाटपाचा तिढा सुटत नसल्याने ठाकरेसेनेने आज संभाजीनगर पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघात आपले उमेदवार जाहीर केले. संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात ठाकरेसेनेने दिलीप हरिभाऊ घुगे यांना तर अमरावती शिक्षक मतदारसंघात दत्तात्रेय श्रीराम लहाने यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघात आघाडीच्या काँग्रेस आणि ठाकरेसेना या दोन्ही मित्रपक्षांमध्येच मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता दिसू लागली आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, विरोधी आघाडीच्या नेत्यांची या निवडणुकीतील जागावाटपाबाबत पुन्हा तिसरी बैठक होणार असून त्यामध्ये काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला बजावली नोटीस

मुख्य निवडणूक आयुक्तामुळे असुरक्षिततेची भावना आहे असे विकास सिंह म्हणाले. सुप्रीम कोर्टाकडून निवडणूक आयोगाला नोटीस जारी करण्यात आली आहे. न्यायमूर्ती बागची म्हणाले की, आम्हाला निवडणूक आयोगाची बाजू सुद्धा ऐकावी लागेल. दरम्यान सुप्रीम कोर्टाने अंतरिम आदेश द्यायला नकार दिला आहे.

**प्रवासात कोयत्याच्या धाकाने कार पळविणारी टोळी जेरबंद**

पथकाने बदलापूर येथे शामसुंदर रविप्रताप गौड (वय २६, रा.कमासीन, ता.पनेरा, जि.महाराजगंज उत्तरप्रदेश हल्ली रा.नेताजी सुभाष चौक, बदलापूर, जि.ठाणे), सिध्दार्थ मिथवा चव्हाण (वय १९, रा.वाघळुज, ता.आष्टी, जि.बीड हल्ली रा.कल्प निसर्ग, बदलापूर जि.ठाणे), किसन दिग्वीजय कहार (वय २२, रा.विजयपूर, ता.जि.महाराजगंज, उत्तरप्रदेश हल्ली रा.बदलापूर, जि.ठाणे) यांना ताब्यात घेतले. त्यांनी इरटिगा कार जेऊर टोलनाक्याजवळ, हनुमान मंदिर परिसरामध्ये लावून, गाडी लॉक करून निघुन गेले व गाडीच्या विक्रीसाठी ग्राहक शोधत असल्याची माहिती सांगितली.पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १,७१,००० रूपये किंमतीचे तीन मोबाईल, एक सीमकार्ड व एक मारूती सुझुकी कंपनीची चावी, इरटिगा कार, दोन लोखंडी कत्ती असा एकुण ११,७१,२०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.



भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री व भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेस हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते अनिल सबलोक तसेच महेश गुगळे , ज्ञानेश्वर धिरडे, लक्ष्मीकांत तिवारी, देवेंद्र दुधाळे, निरज राठोड हे उपस्थित होते. यावेळी अनिल सबलोक यांनी देशाचे माजी माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी व महात्मा गांधी यांनी जे स्वातंत्र्य लढ्यात योगदान दिले त्याच्या आठवणींना उजाळा दिला व त्यांना आदरांजली वाहिली.

# सनातन धर्मसभेतर्फे नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

**समाचार/नगर-दि. ५**

येथील महाजन गल्लीतील सनातन धर्मसभेतर्फे सालाबादप्रमाणे शारदीय नवरात्रौत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. रविवारी दि.११ ऑक्टोबर ला सायंकाळी ५.३० वाजता देवी शारदेचे प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करून वेदमंत्रांच्या घोषात शारदीय नवरात्रौत्सव सोहळ्याचा विधिवत शुभारंभ करण्यात येणार आहे, अशी माहिती धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे गुरूजी आणि उपाध्यक्ष हभप निळकंठ महाराज देशमुख यांनी दिली.

ते म्हणाले, मिती आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १९४८ रविवार दि.११ ऑक्टोंबर २०२६ ते आश्विन शुद्ध अष्टमी सोमवार दि.१९ ऑक्टोंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या शारदीय नवरात्रौत्सव सोहळ्याचा श्रीगणेशा हभप मिलिंद महाराज चवंडके यांच्या प्रवचनाने करण्यात येईल. आदिशक्तीचा जागर हा त्यांच्या प्रवचनाचा विषय आहे. त्यानंतरचे अनुक्रमे वक्ते आणि कंसामध्ये विषय असे:–कथाकथनकार .बाळासाहेब देशमुख (देवी माहात्म्य), रेणुका महिला भजनी मंडळाचे भजन, ज्येष्ठ पत्रकार अनिरूध्द देवचक्के (अंतर्मन ते आत्मभान – शरिर, मन आणि अध्यात्माचा प्रवास), डॉ.सौ.धनश्री खरवंडीकर यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम, वेदमूर्ती महेश रेखे गुरूजी (वेदोडखिलोधर्ममूलम्), पं.श्री. चकोर गुरू मुळे (कर्मकांड आणि ग्रहशांती), हभप निळकंठ महाराज देशमुख (सद् गुरू माहात्म्य), श्रीराम तांबोळी आणि सहकाऱ्यांच्या भजनसंध्येच्या कार्यक्रमाने सनातन धर्मसभेच्या शारदीय नवरात्रौत्सव सोहळ्याची सांगता करण्यात येईल.

नगर शहरासह उपनगरातील स्त्री पुरुष भाविकांनी विशेषतः देवी भक्तांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहून शारदीय नवरात्रौत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मसभेचे मंत्री दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, निलेश धर्माधिकारी, प्रभाताई मुळे खजिनदार उमेश नगरकर, उपाध्यक्ष नंदकिशोर मुळे, चारुदत्त मुळे,राजेंद्र नगरकर,गिरीश मुळे, समीर उपाध्ये मोरेश्वर मुळे आदींनी केले आहे.

# 'रोटरी'तर्फे दंत चिकित्सा शिबीर




**समाचार/नगर-दि. ५**

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून मोफत डेंटल कॅम्पचे (दंत चिकित्सा शिबिर) नुकतेच आयोजन करण्यात आले.

म.ए.सो.चे रेणाविकर विद्यालय येथे झालेल्या या शिबिरात दंततज्ज्ञ डॉ. चंद्रकांत डुंगरवाल व रोटेरियन डॉ. ममता डुंगरवाल यांनी शालेय विद्यार्थ्यांची दंत आरोग्य तपासणी केली. यामध्ये दातांची कीड, हिरड्यांचे आजार, मुख स्वच्छता यावर मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. जवळपास १०० शालेय विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांना डॉ. डुंगरवाल यांच्याकडून मोफत टूथपेस्ट किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी रोटरीचे अध्यक्ष रोटे. प्रभा खंडेलवाल, सचिव रोटे. सुरेखा मणियार, प्रकल्प प्रमुख रोटे. सविता काळे यांच्यासह रोटेरियन विभा तांबडे व इतर सदस्य उपस्थित होते.

दातांचे आरोग्य म्हणजे संपूर्ण शरीराचे आरोग्य. विद्यार्थ्यांमध्ये दंत उपचारांबाबत जनजागृती व्हावी, हाच या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे, असे अध्यक्ष रोटे, प्रभा खंडेलवाल यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमाचे नियोजन रोटे. विभा तांबडे यांनी केले, तर आभार प्रकल्प प्रमुख रोटे. सविता काळे यांनी मानले.

### युवती, महिलांसाठी उद्या

# 'अहिल्येच्या लेकी' प्रेरणादायी कार्यक्रम

**समाचार/नगर-दि. ५**



स्त्री म्हणजे केवळ कुटुंबातील विविध नात्यांची ओळख नसून तिच्यामध्ये नेतृत्व, निर्णयक्षमता, संवेदनशीलता, धैर्य आणि परिवर्तन घडविण्याची शक्ती असते. याच सामर्थ्याची जाणीव महिलांना करून देण्यासाठी 'अहिल्येच्या लेकी' या विशेष महिला सक्षमीकरण उपक्रमाचे आयोजन समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाउंडेशनद्वारा करण्यात आले आहे. मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता आनंदधाम येथे हा कार्यक्रम होणार आहे.

१६ ते ४५ वर्षे वयोगटातील युवती, महिलांना या कार्यक्रमात विनामूल्य प्रवेश असेल.

अहिल्या बाहेर नाही तुमच्यात आहे!' हा संदेश देत महिलांना स्वतःच्या अंतर्मनातील शक्तीची पुन्हा जाणीव करून देणे, स्वतःची किंमत ओळखणे, आयुष्यातील विविध भूमिका आणि नाती यांच्यात संतुलन साधणे, आव्हानांमध्ये खंबीर राहणे आणि स्वतःकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. जागी हो उभी राहा घडवायला सुरुवात करा!' या प्रेरणादायी विचारातून महिलांमधील नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सकारात्मक शक्ती जागृत करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

आजच्या स्त्रीच्या या बहुआयामी जीवनाकडे केवळ एका दृष्टिकोनातून न पाहता गर्भसंस्कारापासून पॅरेंटिंग, ब्लिसफुल कपल, वैवाहिक जीवन, ध्यान–साधना ते जीवनाच्या अंतिम टप्प्यापर्यंतच्या विविध विषयांवर मार्गदर्शन करणारे आध्यात्मिक व जीवनविकासाचे उपक्रम देशभरात तसेच भारताबाहेरही घेऊन जाणारे उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. इतिहासात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत, आजच्या महिलांनी स्वतः मधील सामर्थ्य ओळखावे आणि त्या शक्तीचा उपयोग स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या सकारात्मक परिवर्तनासाठी करावा, हा या उपक्रमामागील व्यापक दृष्टिकोन आहे. अर्हम् विज्ञाच्या माध्यमातून, गुरुदेव श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेतून आयोजित या विशेष उपक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वतःमधील अहिल्येला' जागृत करावे, असे आवाहन समर्पण चातुर्मास समिति व अर्हम विद्या फाउंडेशन द्वारा करण्यात आले आहे.


**समाचार** वाचकांना नम्र सूचना

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



'समाचार'चा अंक सुरु करण्यासाठी
संपर्क – दिनेश कुलथे : ९८२२०३३१४०
ऑफिस : २३४५२७०





# भक्ती संगीत कार्यक्रमाने ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभेत रंगत

**समाचार/नगर-दि. ५**

ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संघाची मासिक सभा दि. २ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली.

वाडिया पार्क लेडीज क्लब भजनी मंडळ यांनी भक्तीधारा हा भक्ती संगीताचा गायनाचा कार्यक्रम सादर केला. नामदेव ,तुकाराम, एकनाथ ,अशा संतांच्या सुंदर अभंगांचे गायन झाले. ताल सुरात भक्ती गीते ऐकण्यात श्रोते रंगून गेले होते. प्रत्येक अभंग वेगळ्या चालींचा आणि मनोवेधक असल्याने एक वेगळीच रंगत आली. महाजन यांनी हार्मोनियमवर साथ दिली. त्यामुळे गायन सुश्राव्य झाले. भक्तीधारा या भक्ती गीतांच्या कार्यक्रमात सर्वच श्रोते उत्स्फूर्तपणे भाग घेत होते. त्यात सर्व कार्यकारणी सदस्य यांचा फार मोठा सहभाग होता.

# 'रामकृष्ण' च्या सभासदांना लाभांश वाटपाचा शुभारंभ

**समाचार/नगर-दि. ५**



दरवर्षीप्रमाणे रामकृष्ण अर्बनच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरिता १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत,चेअरमन किसनलाल बंग,व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, संचालक सर्वश्री राजेंद्र गुजराथी,सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झंवर,ओमप्रकाश चांडक,मधुसूदन सारडा, विश्वनाथ कासट, ॲड.अशोक बंग, अनुराग धूत, अनुरीता झगडे,देवराव साठे, साईनाथ कावट आदींसह संस्थेचे सभासद श्रीकांत काकाणी, श्रीनिवास सारडा, ॲड.आर टी शर्मा, नरेश फिरोदिया,अनिल धोकरीया,सौ.भारती पटेल, देवेंद्र गांधी,रामनिवास झंवर, शोभा सोनी,मुकुंद जाजू, जागृती ओबेराय, ओमप्रकाश धूत,व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, ओ.एस. डी. कुमार आपटे आदी उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संस्थेच्या कार्याचा नावलौकिक महाराष्ट्रात होत आहे.यंदाच्या वर्षी संस्थेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दोन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. संस्थेने आर्थिक प्रगती सोबत सामाजिक कार्यातही पुढाकार घेतला आहे.सभासदांचा हिताचा विचार करता संस्थेने निरंतर १५% लाभांश वाटप करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. असे चेअरमन किसनलाल बंग यांनी सांगितले.

श्रीगोपाल धूत, लक्ष्मीकांत झंवर यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर २५०० रुपयाचा गिफ्ट म्हणून चेक देण्यात आला. तसेच सभासद कल्याण निधीच्या माध्यमातून सभासदांना हॉस्पिटल ची गरज भासल्यास पंधरा हजार रुपयाची मदत दिली जाते. सामाजिक कल्याण निधी मधून गरजूंना ५००० रुपयांची मदत केली जाते. दरवर्षी रक्तदान शिबिरा करिता, गो सेवेकरिता, शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमाकरिता मदत असे विविध उपक्रम संस्थेने वेळोवेळी राबविले आहेत.

अनिल धोकरीया, ॲड.आर टी शर्मा, मुकुंद जाजू,रामनिवास झंवर, शोभा सोनी, जागृती ओबेरॉय आदिंनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. आभार व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू यांनी मानले.

## मुंबई शेअर भाव

**रिलायन्स इंडस्ट्रीजचा जिओ प्लॅट फॉर्म लवकरच बाजारात**

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन–२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९६९१

**दिनांक ५-१०-२०२६**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७२१२० |
| एसीसी | ११८४–८५ |
| एशियन पेंट | २३४५–४६ |
| बजाज ऑटो लि. | १०००१–०२ |
| बलराम फूड चिनी | ६७२–७३ |
| भारत फोर्ज | १८३२–३३ |
| क्रॉम्प्टन | २१०–११ |
| डीएलएफ | ६७३–७४ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ११९७–९८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ८११–१२ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | १८३२–३३ |
| आयटीसी लि. | २६१–६२ |
| एल ॲण्ड टी लि. | ३७२६–२७ |
| रिलायन्स इंड. | ११८८–८९ |
| एसबीआय | ९६०–६१ |
| टाटा मोटर्स | २८७–८८ |
| टाटा स्टील | १७८–७९ |
| टीसीएस | २१०८–०९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १७९–८० |
| कोव्हान्स फार्मा | ४४८–४९ |

## शिक्षक भारतीची शिक्षण मंडळाकडे मागणी

# बारावीची परीक्षा मार्चमध्येच घ्या

**समाचार/नगर-दि.५**

इयत्ता १२ वी एचएससी परीक्षा २०२७ ची सुरुवात फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात करण्याऐवजी फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात अथवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात करण्यात यावी, अशी ठाम मागणी शिक्षक भारती पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे केली आहे. याबाबत त्यांनी मंडळाच्या अध्यक्ष व सचिवांना निवेदन सादर करून सध्याच्या वेळापत्रकाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

सध्याच्या उपलब्ध वेळापत्रकानुसार बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार आहे. मात्र, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करणे, प्रात्यक्षिके, अंतर्गत मूल्यमापन, लेखन सराव, घटकनिहाय चाचण्या, पुनरावृत्ती आणि बोर्ड परीक्षेची तयारी या सर्व बाबींसाठी पुरेसा प्रत्यक्ष अध्यापन कालावधी आवश्यक असल्याचे प्रा. पाडेकर यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. परीक्षेची घाई नको; विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ द्या! बारावीचा अभ्यासक्रम केवळ धडे पूर्ण करण्यापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांना संकल्पनात्मक आकलन, लेखनकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, प्रायोगिक ज्ञान आणि वेळेचे नियोजन यांचा सराव करून देणे आवश्यक आहे. परीक्षा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरू झाल्यास अभ्यासक्रमाच्या अंतिम टप्प्यासाठी, संपूर्ण पुनरावृत्तीसाठी आणि सराव परीक्षांसाठी उपलब्ध कालावधी कमी होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना नियमित अध्यापनासोबत प्रात्यक्षिके, अंतर्गत मूल्यमापन, चाचण्या, उत्तरपत्रिका तपासणी, शैक्षणिक नोंदी, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि बोर्ड परीक्षेची तयारी,जनगणना व इतर अशैक्षणिक कामे अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे परीक्षा दिनदर्शिका निश्चित करताना शिक्षकांवरील अध्यापनाच्या कामाच्या भाराचाही विचार करणे आवश्यक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. मंडळाने तातडीने फेरविचार करावा परीक्षा घेणे एवढेच मंडळाचे उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, सर्वांगीण विकास आणि परीक्षेतील न्याय्य संधी यांचे संरक्षण करणे हेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे केवळ प्रशासकीय सोय न पाहता विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्यक्ष अध्यापन कालावधी, अभ्यासक्रमाची व्याप्ती, पुनरावृत्तीचा कालावधी, शिक्षकांवरील कामाचा भार आणि विद्यार्थ्यांचा मानसिक ताण या सर्व बाबींचा समतोल विचार करून परीक्षा दिनदर्शिकेचा पुनर्विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



## गुरूवाणी ७०

### भक्ती शक्तीशालीच हवी

आपण सर्वांनी जंबूस्वामींप्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांच्यामुळे प्रभूरूपी कल्पवृक्ष आपल्याला मिळाला. त्यांच्या मनात तीर्थंकर जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. यातून पुढे सुधर्मा स्वामींचे अद्भुत तीर्थंकर महावीर आपल्याला कळले. त्यांची अनंत शक्ती कळली. म्हणून सर्व पर्वतात सुमेरू पर्वत सर्वश्रेष्ठ आहे. जिथे जन्म होतो तिला जात म्हणतात. तीर्थंकर महावीरांची जाती सुमेरू पर्वत आहे. ही जात शक्तीमान आहे. गुरूदेवांच्या जन्मभूमी, दीक्षा भूमी, कर्म भूमीतील संघ शक्ती संपन्नच हवा. संघ श्रीमंत असेल पण शक्तीशालीही हवा. शक्ती नसेल तर यश मिळणार नाही. तीर्थंकर महावीरांचे यश सुमेरू पर्वतासारखे आहे. अनेक जण आले पण त्यांच्या यशाला ग्रहण लावू शकले नाही. लोकमान्य टिळक सुद्धा गीतारहस्यात लिहितात, 'आज भारतीय धर्मात जो शाकाहार आहे, त्याचे संपूर्ण श्रेय जैन धर्माचे आहे'. आहाराबरोबर धर्म जोडणारा एकमेव जैन धर्म आहे. याला म्हणतात महान यश. विनोबा भावे म्हणायचे, 'भगवान महावीर यांची जिनवानी माझ्यासाठी गोमातेचे दूध आहे'. महात्मा गांधी यांनी अहिंसा व सत्याग्रहाद्वारे देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. जगात कुठेही हिंसेशिवाय असा स्वातंत्र्य लढा झालेला नाही. महात्मा गांधी यांच्यातील अहिंसा, उपवास हे भगवान महावीरांकडूनच आलेत. तीर्थंकरांनी हिंसेने नाही तर अहिंसेने कोणालाही बदलता येते हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. तुम्ही जेव्हा घरात भांडता तेव्हा घरात निगेटिव्ह स्पंदने तयार होतात. भांडायचे असे की कचरा उचलून तो कचरा कुंडीत टाकायचा. तुम्ही भांडताल तेव्हा कचरा एकमेकांवरच टाका. तो इतरांच्या कानापर्यंत पोहोचला नाही पाहिजे. आपण सगळ्यांनी ऐकलेय की, 'सत्यमेव जयते'. पण तीर्थंकर भगवान महावीर म्हणतात, 'जो आपल्या शक्तीला जागृत ठेवतो त्याचा विजय होतो'. विजेता होण्यासाठी शक्तीच हवी. श्रद्धा सुद्धा शक्तीशालीच हवी. नुसती श्रद्धा असून उपयोग नाही. गुरूदेवांप्रती तुमच्या सर्वांच्याच मनात भक्ती आहे. पण भक्तीत श्रद्धा नाही, ही वस्तुस्थिती आहे. गुरूदेवांच्या या नगरच्या भूमीत संप्रदायाचे बीज लावले गेले आहे, हे दुर्दैव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडे शक्तीशाली मावळे होते म्हणूनच हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. गुरूदेवांचे असे शक्तीशाली मावळे तयार झाले पाहिजे. शक्ती नसलेली भक्ती म्हणजे बिनधारी तलवार असते.

**उपाध्याय प्रवर**
**पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.**

## विहिंपतर्फे १० ऑक्टोबरला सामुदायिक श्राध्द

**समाचार/नगर-दि. ५**



भाद्रपद महिन्यातील संपूर्ण वद्य पक्ष हा पूर्वजांसाठी समर्पित असतो. या पक्षात पितरांचे स्मरण करून त्यांचे पूजन केले जाते. सर्व पित्री अमावस्येच्या दिवशी पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी त्यांच्या नावाने श्राद्ध विधी करणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर सर्व हिंदू समाज बांधवांसाठी विश्व हिंदू परिषद प्रणित मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाच्या वतीने लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठ येथे शनिवार दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत सामुदायिक श्राद्ध, तर्पण (पितरांचे पूजन) चे आयोजन करण्यात आले आहे.

पूजेसाठी तांब्या, ताम्हण, पळी, फुलपात्र, तुळशीची पाने, पूर्वजांचा फोटो, बसकर, नॅपकीन. पूजेसाठी लागणारे इतर सर्व साहित्य विहिंपच्या मंदिर, अर्चक, पुरोहित आयामा तर्फे मोफत दिले जाणार आहे. हिंदू बांधवांनी या पवित्र कार्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पुण्य लाभ घ्यावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री अनिल जोशी,मंदिर,अर्चक, पुरोहित,आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे,

जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत नांदापूरकर व जिल्हा सह-प्रमुख हरीभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर यांनी केले आहे.

अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क - हरिभाऊ डोळसे (माळीवाडा)-मो.९८२२२७१८०७, गजेंद्र सोनवणे (नालेगाव) मो.९४२२७२७७२६ - मुकुल गंधे (सावेडी उपनगर) -मो.९८९०३३६७७७ - अ‍ॅड. सचिन पाठक गुरुजी (सावेडी)-मो. ९५११११११६२,श्रीकांत नांदापूरकर (पाईपलाईन रोड) - ७०२०७५४७६१,अमोल भांबरकर (कल्याण रोड)-मो. ७९७२००१९३४,अरुण खिची (केडगाव) -मो.७२६३९००००६,मिलिंद मोभारकर (बालिकाश्रम रोड)-मो. ९९२३००२४४७ यांच्याशी संपर्क साधावा.

## शालेय कुस्ती स्पर्धेत संदेश जाधवला सुवर्णपदक

**समाचार/नगर-दि. ५**



नेवासा फाटा येथील दादासाहेब घाडगे पाटील विद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत निमगाव वाघा (ता. नगर) येथील संदेश जाधव याने दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संदेश जाधव याने १९ वर्षे वयोगटातील ९७ किलो वजनगटात प्रतिस्पर्ध्यांना चुरशीची लढत देत उत्कृष्ट कामगिरी केली. ताकद, चपळाई आणि कुस्तीतील डावपेचांचा प्रभावी वापर करत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. संदेश जाधव हा निमगाव वाघा येथील रहिवासी असून, तो टाकळी खातगाव येथील हनुमान विद्यालयात इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच कुस्तीच्या सरावावर सातत्याने लक्ष केंद्रित करत त्याने जिल्हास्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आता पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेतही दमदार कामगिरी करण्याचे त्याचे ध्येय आहे.

पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करमाळा (जि. सोलापूर) येथे करण्यात आले आहे. संदेश जाधव याला नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष नाना डोंगरे तसेच क्रीडा शिक्षक मिलिंद थोरे यांचे मार्गदर्शन लाभत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली संदेश सातत्याने सराव करत आहे.



## गुरूवाणी ७१

### उत्तुंगही आणि व्यापकही..

सुधर्मा स्वामी भगवान महावीर यांची वेल आहे. ही 'विरत्थुई' त्यांच्या अनुभूतीतून जन्मली. तीर्थंकरांकडे शक्ती बरोबरच कल्याण, समृद्धी, विश्व कल्याणाची प्रज्ञा होती. परमात्म्याची प्रज्ञा केवळ सुमेरू पर्वताइतकी मर्यादित नाही. जे सुमेरू पर्वतात नाही ते सुद्धा तीर्थंकरांमध्ये आहे, ही अनुभूती सुधर्मा स्वामी व्यक्त करतात. तीर्थंकरांची प्रज्ञा अधिक व्यापक आहे. अनेक जण खूप वर पाहतात. नारळ, सागवानाचे झाड उंच असतात पण परिघ कमी असतो. जो व्यक्ती सगळ्यांना सोबत घेऊन चलतो त्याला कुठे ना कुठे तडजोड करावी लागते. जो सगळ्यांना सोबत घेऊन चालत नाही तो एकटा पडतो. तीर्थंकर महावीर प्रचंड उत्तुंग होते आणि त्यांचा प्रज्ञेचा परिघही विशाल होता. आचार्य गुरूदेवांकडे लहान मुले आली, विद्यार्थी आला, साधक आला तर ते प्रत्येकाशी त्याच्याच भाषेत बोलत. ते उत्तुंग होते आणि सर्वांना सोबत घेऊन चालायचे. अशी कला असणारेच युग निर्माण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी सगळ्यांना सोबतही घेतले आणि शिखरही गाठले. भगवान महावीरांकडे एकदा स्कंदक संन्यासी एक प्रश्न घेऊन आला. स्कंदक आणि इंद्रभूती गौतम जुने मित्र होते हे महावीरांना माहिती होते. तीर्थंकरांनी इंद्रभूती गौतमला बोलावून घेतले. स्कंदक संन्यासीचे स्वागत करण्यासाठी इंद्रभूती गौतम पुढे आले. स्कंदक आनंदीत झाला, तीर्थंकरांचा शिष्य माझ्या स्वागतासाठी आला. त्याला हे अनपेक्षित होते. दोघेही तीर्थंकरांकडे गेले. स्कंदक व तीर्थंकरांचे बोलणे झाले. आणि स्कंदकने लगेच दीक्षा घेतली. तीर्थंकर स्वतः उत्तुंग असूनही समोर कोणीही असला तरी सामान्य बनूनच राहायचे. एक कुंभार गोशालकाच्या विचारांनी प्रेरित असतो. तीर्थंकरांना वाटते त्याला सत्याचा बोध झाला पाहिजे. ते स्वतः कुंभाराकडे गेले पण कुंभार तीर्थंकरांना वंदना करत नाही. तरीही ते विचारतात 'मला तुझ्याकडे रहायला जागा मिळेल का'? इतका सामान्यपणा त्यांच्यात होता. कुंभार होकार देतो. ते कुंभाराला विचारतात, 'हे भांडे भाग्याने बनले की तुझ्या पुरुषार्थाने बनले? कुंभार म्हणतो, 'मी नाही बनवले ते तर नियतीने बनवले'. मग तीर्थंकर विचारतात, ते कोणी फोडले तर तू नियतीवर सोडून देशील की त्याला चोप देशील? कुंभार निःशब्द होतो. त्याला सत्य कळते आणि तो लगेच स्विकारतोही. आपण मात्र सत्य कळलं तरी ते लगेच स्विकारत नाही. असे सुधर्मा स्वामींचे भगवान महावीर आपले झाले पाहिजेत. एकदा ते आपले झाले तर आपल्यावर अपार कृपा वर्षाव होईल.

**उपाध्याय प्रवर**
**पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.**

## जीजेसीच्या इंडियाचा 'जेम अँड ज्वेलरी शो' च्या १०व्या आवृत्तीचा शुभारंभ



ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल (जीजेसी) ने अभिमानाने इंडिया जेम अँड ज्वेलरी शो (जीजेएस २०२६ दिवाळी एडिशन) च्या १०व्या आवृत्तीचे उद्घाटन केले. HumarapnaShow म्हणून साजरे होणारे हे भारतातील सर्वात प्रीमियम बी२बी ज्वेलरी प्रदर्शन मुंबई येथे सुरू झाले असून या शोमध्ये देश-विदेशातील ज्वेलर्स, डिझाइनर्स, खरेदीदार आणि उद्योग नेते एकत्र येणार आहेत. भव्य उद्घाटन सोहळ्याला मुख्य अतिथी उदय सामंत, उद्योग व मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र शासन उपस्थित होते. तसेच गेस्ट ऑफ ऑनर श्री. श्रीनिवास इन्जेटी, चेअरमन, IAGES; महेश जैन, अध्यक्ष, यूपी सराफा असोसिएशन आणि विशेष अतिथी राजीव जैन, चेअरमन, जेजेसी उपस्थित होते. या कार्यक्रमाला राजेश रोकडे, चेअरमन जीजेसी; अविनाश गुप्ता, उपाध्यक्ष जीजेसी; सैय्यम मेहरा, संयोजक जीजेएस व माजी चेअरमन जीजेसी तसेच जीजेसी कमिटी ऑफ अ‍ॅडमिनिस्ट्रेशनचे सदस्य आणि इतर वरिष्ठ उद्योग नेते उपस्थित होते. या उपस्थितीने भारताच्या ज्वेलरी उद्योगातील सामूहिक ताकद आणि एकतेचे दर्शन घडवले.या शोमध्ये विविध उत्पादन श्रेणींचा समावेश असेल-सोन्या-चांदीचे दागिने, कुट्युर आणि हिरेजडित दागिने, सैल हिरे, रत्न व मोती, लॅब ग्रोन हिरे व दागिने, तसेच allied व मशिनरी. जीजेसी हा भारताच्या ५,000 वर्षांच्या दागिन्यांच्या वारशाला अभिवादन आहे, तसेच नवकल्पना, कारागिरी आणि उत्कृष्टतेची नवी परंपरा सादर करतो.

## ३डी एचएल एक्सप्रेसची भारतात ८.९% शुल्क वाढीची घोषणा

जगातील आघाडीचा इंटरनॅशनल एक्सप्रेस सर्व्हिसेस प्रोव्हायडर डीएचएल एक्सप्रेसने भारतात शुल्क वाढीची घोषणा केली. १ जानेवारी २०२७ पासून लागू होतील. भारतात ही वाढ ८.९% असेल.इंटरनॅशनल ट्रेड व्यवसायांसाठी नवीन संधी निर्माण करत राहतो, तर सप्लाय चेन सतत जास्त आंतरजोडलेल्या आणि गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत. डीएचएल एक्सप्रेस दरवर्षी आपल्या किंमतींमध्ये अ‍ॅडजेस्टमेंट करते जेणेकरून महागाईचा दबाव, चलनातील चढ-उतार आणि उद्योगाशी संबंधित कॉस्ट डेव्हलपमेंट्स विचारात घेतले जाऊ शकतील. २२० पेक्षा जास्त देश आणि प्रदेशांमध्ये काम करणारा इंटरनॅशनल स्तरावर एकात्मिक व्यवसाय म्हणून, डीएचएल एक्सप्रेसवर केवळ स्थानिक आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत नाही, तर ग्लोबल मार्केटमधील बदलांचाही परिणाम होतो.महागाईशिवाय, कंपनीच्या कॉस्ट स्ट्रक्चरवर एनर्जी कॉस्ट, कंप्लायन्स रिक्वायरमेंट्स आणि नॅशनल व इंटरनॅशनल अथॉरिटीजद्वारे लागू केलेल्या बदलत्या कस्टम, रेग्युलेटरी आणि सिक्युरिटी उपायांशी संबंधित अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह खर्चांसारख्या घटकांचा परिणाम सुरू आहे. अनेक देशांमधील लेबर मार्केटचे सततचे दबावही ऑपरेशनल कॉस्ट वाढवण्यात योगदान देतात.

## शिकागो न्यूमॅटिकचा नवीन पोर्टेबल एअर कॉम्प्रेसर



शिकागो न्यूमॅटिक इंडियाने त्यांचा नवीन उझड ९५०-३०० पोर्टेबल एअर कॉम्प्रेसर प्रस्तुत केला आहे, जो वॉटरवेल, मायनिंग आणि सोलर फाऊंडेशन ड्रिलिंगच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केला आहे. उत्कृष्ट एअर डेलिव्हरी, इंधन बचत आणि कामातील लवचिकता एकत्र करून, हा कॉम्प्रेसर कंत्राटदारांना अधिक खोलवर ड्रिल करण्यास, प्रकल्प जलद पूर्ण करण्यास आणि नफा वाढवण्यास मदत करण्यासाठी डिझाईन केला आहे. ड्रिलिंग उद्योगात कंत्राटदारांना अधिक खोलवर ड्रिलिंगच्या गरजा, कठीण आणि बदलत्या जमिनीची परिस्थिती, खालावलेली भूजल पातळी, वाढता खर्च आणि प्रकल्पाच्या वेळेच्या कडक मर्यादा यांचा सामना करावा लागत असल्याने कामाचा ताण वाढताना दिसत आहे. त्याच वेळी, सोलर इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासात झालेल्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर फाऊंडेशन ड्रिलिंगची मागणी वाढली आहे, ज्यामुळे उत्पादकता, अचूकता आणि विश्वासार्हता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे.




संकलन-संयोजन
सुशीलकुमार
susheelkumar80@yahoo.com

## शब्दखेळ - ६३१

**खाली दिलेल्या चौकोनात एका चित्रपटाचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऐ | क | व | ट | मा | वि | र | दा |
| शि | ग | पि | ब | आ | ता | ध | द |
| ण | ह | क | मी | ठ | ड | म | णा |
| म | गा | ळी | हि | त | रं | ल | ढा |
| सां | मा | थ | न | ल | ल | क्स | गी |
| प | क | व | पु | ज | श | र | बा |
| ल | ती | बा | बा | लो | वा | की | चु |
| न | भा | त्या | त | मा | ळ | ड | ण |

### शब्दखेळ - ६३० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टू | व | सु | ता | क | पी | वी | फ |
| था | टो | च | उ | मो | ज | अ | क |
| झे | फ्रे | र | बॉ | स्ट | न | क्स | गो |
| ले | स्नो | शा | मा | मा | बो | मे | र |
| सी | ज | बो | ल | व | फी | जा | ओ |
| ह्यु | आ | ट | टा | शी | वा | री | स्टी |
| स्ट | गे | श | त्र | जा | गं | क | डे |
| म | ल | ली | नो | टू | मं | द | ळ |

उत्तर - सीताफळ

## मॅपिक इंडिया २०२६ चे मुंबईत उद्घाटन



मॅपिक इंडिया २०२६ चे मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे उद्घाटन झाले. भारताच्या रिटेल विकासाच्या पुढील टप्प्याला आकार देणाऱ्या शक्तींचा शोध घेण्यासाठी, या कार्यक्रमात भारत आणि जगभरातील आघाडीचे रिटेलर्स, डेव्हलपर्स, गुंतवणूकदार, ब्रँड्स, तंत्रज्ञान कंपन्या आणि इतर प्रमुख भागधारक एकत्र आले आहेत.

आरएक्स इंडियाद्वारे आयोजित, हा दोन दिवसीय कार्यक्रम रिटेल, रिअल इस्टेट, खाद्य आणि पेय, मनोरंजन, तंत्रज्ञान आणि सेवा या परिसंस्थांना जोडणारे एक उच्च-स्तरीय परिषद, प्रदर्शन आणि नेटवर्किंग व्यासपीठ आहे. 'द इंडिया डव्हान्टेज: सुधारणा, रिटेल आणि वाढता उपभोग' या संकल्पनेवर आधारित उद्घाटन दिनात, भारताची विस्तारणारी उपभोग अर्थव्यवस्था, विकसित होत असलेले रिटेल स्वरूप आणि रिटेल रिअल इस्टेटमधील वाढत्या संधींवर लक्ष केंद्रित करण्यात आले.उद्योग क्षेत्रातील नेत्यांनी भारताच्या पुढील रिटेल पर्वावर चर्चा केली.'द इंडिया डव्हांटेज: फ्रॉम रिफॉर्म टू रिटेल ग्रोथ इन अ रायझिंग कन्झम्प्शन इकॉनॉमी' या उद्घाटन सत्रात लॅकोस्ट इंडिया, शॉपर्स स्टॉप, रिलायन्स रिटेल, एल'ओस्टेरिया, आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल आणि नायका फॅशन येथील वरिष्ठ नेते एकत्र आले होते. या सत्रात भारतातील बदलणारे ग्राहक, रिटेल स्वरूप आणि वाढीच्या संधींचा आढावा घेण्यात आला.

# गुरुदर्शन संघ यात्रोत्सव भक्तिभावाने साजरा

**समाचार/नगर-दि.५**



श्री वर्धमान जैन श्रावक संघ व गुरुदेव युवा मंच, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने वर्ष ३ रे एकदिवसीय गुरुदर्शन संघ यात्रेचे आयोजन करण्यात आले. श्रावक संघाचे अध्यक्ष पन्नालालजी बोकरीया* यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ही यात्रा अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संघयात्रेत श्रावक संघाचे पदाधिकारी तसेच गुरुदेव युवा मंच चे सदस्य व महिला मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यात्रेदरम्यान बार्शी येथे महासाध्वी परमपूज्य प्रणवदर्शनाजी म.सा. व साध्वी परमपूज्य ईशदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेण्यात आले. त्यानंतर कुरुडवाडी येथे महासाध्वी परमपूज्य श्री. सुनंदाजी म.सा. आदी ठाणा यांचे दर्शन घेण्याचा लाभ भाविकांना मिळाला. तसेच दौंड येथे महासाध्वी श्री. दिव्यदर्शनाजी म.सा. व साध्वी परमपूज्य पुनीतदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेऊन भाविकांनी आशीर्वाद व सान्निध्याचा लाभ घेतला. या संपूर्ण यात्रेदरम्यान सहभागी भाविक नेहा बाफना यांच्या सुमधुर व भक्तिमय वाणीने सर्व ठिकाणी भक्तिगीते सादर करण्यात आली. त्यांच्या सुमधुर गायनामुळे यात्रेतील वातावरण अधिकच भक्तिमय झाले. गुरुदर्शन, भक्तिगीतांचा स्वर आणि साध्वीजी भगवंतांचे आशीर्वाद यामुळे संघ यात्रेचा आध्यात्मिक आनंद द्विगुणित झाला. धर्म, संस्कार आणि समाजातील एकता दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही गुरुदर्शन संघ यात्रा सहभागी भाविकांसाठी आध्यात्मिक समाधान देणारी व अविस्मरणीय ठरली. एकजूट हीच आपली ताकद, संघटन हीच आपली ओळख आणि समाजहित हेच आमचे ध्येय!सर्वांना सोबत घेऊन एक मजबूत, सक्षम आणि एकसंघ समाज बनवणे हेच आमचे लक्ष आहे.असे प्रतिपादन श्री. रोशन चोरडीया यांनी केले संघ यात्रेत सहभागी झालेल्या सर्व धर्मप्रेमी, श्रावक - श्राविकांचे श्री वर्धमान जैन श्रावक संघाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## 'मागे वळून पाहतांना' लेखसंग्रहाचे प्रकाशन

# भाषा समृध्दीत 'शब्दगंध'ची चळवळ उपयुक्त-भोसले

**समाचार/नगर-दि.५**



शब्दगंध साहित्यिक परिषदेची चळवळ ग्रामीण भागापर्यंत झपाट्याने पोहोचली असून कथाकथन, काव्यसंमेलन, पुस्तक प्रकाशन, साहित्य संमेलन आदी विविध साहित्यिक उपक्रम सातत्याने राबवून शब्दगंधने साहित्य क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी शब्दगंधने साहित्य संमेलनांच्या विचारपीठावरून सातत्याने भूमिका मांडली. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून, भविष्यात मराठी भाषा अधिक समृद्ध करण्यासाठी शब्दगंधची चळवळ निश्चितच उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितीचे माजी सभापती, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते,कृषितज्ज्ञ बापूसाहेब भोसले यांनी केले.अभिजात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य च्या वतीने शर्मिला गोसावी संपादित 'मागे वळून पाहताना' या लेखसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच बापूसाहेब भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी शहर सहकारी बँकेचे माजी चेअरमन सुरेश चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. मेधाताई काळे, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, सुभाष सोनवणे, रेखाचित्रकार सतीश कुलकर्णी, मसाप चे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

लेखसंग्रहाच्या संपादक शर्मिला गोसावी यांनी प्रास्ताविकातून संग्रहामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी सुभाष सोनवणे, संतोष कानडे, ज्ञानदेव पांडुळे, विठ्ठल सोनवणे आणि स्नेहा पंजाबी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास जालिंदर बोरुडे, स्वाती अहिरे, क्रांती करंजगीकर, वॉरियर्स फाउंडेशनच्या सचिव संगीता गिरी यांच्यासह अनेक साहित्यिक व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.अनिल गर्जे यांनी केले, तर प्रा.डॉ.तुकाराम गोंदकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बबनराव गिरी, मकरंद घोडके,शामा मंडलिक, संदीप गोसावी,हर्षली गिरी, दिशा व अनुष्का गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रौप्य महोत्सवी रक्तदान शिबिरास प्रतिसाद

# जीवनदायी उपक्रमाची शताब्दी साजरी व्हावी - गंधे



**समाचार/नगर-दि.५**

रौप्य महोत्सवी रक्तदान शिबिरास दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर रक्तदान हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांसाठी नव्या जीवनाची संधी देणारे मानवतेचे श्रेष्ठ कर्तव्य आहे. हे कर्त्यव्य सेवायज्ञाच्या भावनेने गेल्या २४ वर्षांपासून स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्ट नि:स्वार्थपणे बजावत आहे. या अखंडीत रक्तदान शिबिरांच्या उपक्रमामुळे समाजात रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण झाली आहे. तसेच अनेक तरुण, सामाजिक कार्यकर्तेआणि नागरिक नियमित रक्तदाते बनले हे मोठे यश आहे. रौप्य महोत्सव साजरा करणाऱ्या या जीवनदायी उपक्रमाची शताब्दी साजरी व्हावी, असे गौरोवोद्गार भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांनी काढले. भिंगारच्या स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्टच्या रौप्य महोत्सवी रक्तदान शिबिराचे उद्धाटन महेंद्र गंधे यांच्या हस्ते झाले. यावेळी २५ वर्षांपासून अखंडपणे रक्तदान शिबिरांचे आयोजन केल्याबद्दल ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोदराव मुळे यांचा गौरव महेंद्र गंधे यांच्या हस्ते करण्यात आला, या कार्यक्रमास उपाध्यक्ष रमेश वराडे, कार्यध्यक्ष रुपेश भंडारी, सचिव शिवप्रसाद काळे, शिबीर संयोजक सुनील तरवडे, छावणी परिषदेचे सदस्य वसंत राठोड, जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, शोभा भंडारी यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व मोठ्या संख्येने रक्तदाते उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रमोद मुळे म्हणाले, स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रयोधिनी ट्रस्ट गेली ३० वर्षे विविध सामाजिक, शैक्षणिक, सेवाविषयक, समाजउपयोगी उपक्रम राबवित आहे. यामध्ये गेली २४ वर्षे सातत्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करुन रुग्ण सेवेत्त्या यज्ञात आहुती टाकत आहोत. या शिबीरातून आजवर तब्बल २८९२ इतक्या विक्रमी संख्येने रक्तदात्यांनी निरपेक्ष भावनेने रक्तदानाचे कर्तव्य बजावले आहे. आम्ही परमेश्वराला प्रार्थना करतो की प्रत्येक रक्तदाता निरोगी सदृढ राहो व दिर्घायु होवो.

यावेळी स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधनी ट्रस्टचे रितेश फिरोदिया, रवींद्र जाजू, राम घुले, सुधीर कुलट, गोरक्षनाथ वामन, दत्तात्रेय चिपाडे, संगीता देऊळगावकर, संजय शिंदे, डॉ. वर्षा कीर्तने व सचिन कस्तुरे यांच्यासह रक्तपेढीचे आदित्य चांदेकर, गजेंद्र सोनवणे, डॉ.झेंडे आदींसह नागरिक उपस्थित होते.



# ग्राहक चळवळ पुस्तकाचे राष्ट्रीय कार्यकारी परिषदेत प्रकाशन

**समाचार/नगर-दि.५**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या राष्ट्रीय कार्यकारी परिषदेच्या उदघाटन सत्रात मध्य महाराष्ट्र प्रांताचे कोषाध्यक्ष तथा ज्येष्ठ ग्राहक कार्यकर्ते विलास जगदाळे लिखित ग्राहक चळवळ या पुस्तकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले. या वेळी ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण शहा, राष्ट्रीय सचिव जयंती कथेरिया, मध्य महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी, ग्राहक संघटनेतील ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप शिंदे तसेच पुस्तकाचे लेखक विलास जगदाळे उपस्थित होते.ग्राहक चळवळ या पुस्तकातून ग्राहक जागृती, ग्राहकांचे हक्क, कार्यकर्त्यांची भूमिका, संघटन उभारणी आणि चळवळीच्या माध्यमातून समाजजागृती यांचा अनुभवाधारित आढावा घेण्यात आला आहे. ग्राहक चळवळीतील अनेक वर्षांच्या कार्यातून आलेले अनुभव, प्रसंग आणि कार्यकर्त्यांसमोरील आव्हाने यांचे मांडणीच्या माध्यमातून पुढील पिढीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मिळावे, हा पुस्तकामागील प्रमुख उद्देश आहे. विलास जगदाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून ग्राहक चळवळीत सक्रिय असून विविध स्तरांवर ग्राहक जागृती, मार्गदर्शन व संघटनात्मक कार्य करीत आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवाचे संकलन ग्राहक चळवळ या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांसमोर आले आहे.

# शहर सहकारी बँकेची वार्षिक सभा खेळीमेळीत



**समाचार/नगर-दि.५**

अहमदनगर शहर सहकारी बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सीए गिरीश घैसास यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली या आर्थिक वर्षात बँकेनेउत्तम आर्थिक कामगिरी नोंदवत ४ कोटी १५ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. बँकेचा ग्रॉस एनपीए २.५७ टक्के, तर निव्वळ एनपीए १.०३ टक्क्यांवर आला असून, वसुलीसाठी करण्यात आलेल्या विशेष प्रयत्नांमुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी सांगितले. अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. प्रारंभी गिरीश घैसास यांनी अहवाल वर्षातील बँकेच्या कामगिरीचा आढावा घेतला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनी विषयपत्रिकेचे वाचन करून विविध ठराव मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवले. सभासदांनी सर्व ठरावांना एकमुखाने मंजुरी दिली. त्यानंतर झालेल्या चर्चासत्रात बँकेचे सभासद बी.एम. बांदल, रत्नाकर कुलकर्णी, बबनराव झावरे, बागडे, शिंदे, तागडे, ॲड. विनायक इंगळे आदी सभासदांनी सहभाग घेतला.

दि अंबिका महिला नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर नव्याने नियुक्त झालेल्या संचालिका डॉ. दीपाली अनभुले, प्रा. आरती मांढरे, प्रा. शिल्पा वाघ आणि प्रा. वैशाली मरकड यांचा शहर बँकेच्या संचालिका रेश्मा आठरे आणि स्वाती कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.बँकेचे संचालक जयंत येलूलकर यांची महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेच्या विभागीय कार्यवाहपदी निवड झाल्याबद्दल चेअरमन सीए. गिरीश घैसास यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. बँकेचे माजी संचालक सुरेश चव्हाण यांना नुकताच समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल व्हा. चेअरमन प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच बँकेचे सभासद ॲड. रवींद्र शितोळे यांची लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाच्या समितीवर सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.शहरातील वाहतूक व्यवस्थेत निःस्वार्थी भावनेने काम करणारे समाजसेवक अविनाश देडगांवकर यांचाही सत्कार करण्यात आला.वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, अशोक कानडे, संजय घुले, डॉ. विजयकुमार भंडारी, शिवाजी कदम, रेश्मा आठरे, जयंत येलूलकर, निखिल नहार, डॉ. भूषण अनभुले, प्रदीपकुमार जाधव, दत्तात्रय रासकोंडा, स्वाती कांबळे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य विवेकानंद पवार, ॲड. विवेक आंधळे तसेच सेवक प्रतिनिधी संतोष मखरे उपस्थित होते.

## एकात्मिक आरोग्य समितीची बैठक

# आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा-डॉ. बोरुडे

**समाचार/नगर-दि.५**

अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग कार्यालय, सावेडी येथे एकात्मिक आरोग्य समितीची बैठक समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. शासनाच्या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांची व्यापक जनजागृती करण्याची गरज असल्याचे यावेळी डॉ. सागर बोरुडे यांनी सांगितले.महापालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना आरोग्याच्या विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र, या सुविधांची माहिती अनेक नागरिकांना नसते. त्यामुळे प्रत्येक मनपा आरोग्य केंद्राच्या बाहेर त्या केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती दर्शनी भागात फलकाद्वारे लावण्यात यावी, अशा सूचना डॉ. सागर बोरुडे यांनी दिल्या.



शासनाच्या माध्यमातून विविध आरोग्य सुविधा उपलब्ध होत असून त्या समाजातील शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी सर्वांची आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये मोफत औषधांची सुविधा उपलब्ध असून डायबिटीज, सर्दी-खोकला यासह टी. टी. इंजेक्शन, रेबीज इंजेक्शन आदी सुविधा उपलब्ध आहेत. या सुविधांचा गरजू रुग्णांना प्रत्यक्ष लाभ झाला पाहिजे, असे डॉ. बोरुडे यांनी स्पष्ट केले. आशा सेविका तसेच आरोग्य सेविकांनी आरोग्य सुविधांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावी, जेणेकरून सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना महापालिकेच्या आरोग्य सुविधांचा लाभ घेता येईल. तसेच प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयानुसार दर महिन्याला बैठक घेऊन आरोग्य सुविधांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल. कामामध्ये कोणाकडूनही कामचुकारपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही एकात्मिक आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांनी दिला.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर म्हणाले की, महापालिकेच्या माध्यमातून शहरात विविध आरोग्य केंद्रे तसेच 'आपला दवाखाना' सुरू असून त्याद्वारे नागरिकांना विविध आरोग्य सुविधा दिल्या जात आहेत. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा. तसेच डॉक्टर, सिस्टर आणि आशा सेविकांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे. बैठकीदरम्यान आरोग्य सेविकांनी आरोग्य केंद्रांमध्ये येणाऱ्या विविध समस्यांची माहिती समितीसमोर मांडली. आरोग्य केंद्रांमध्ये काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामध्ये ऑनलाइन कामांचे प्रमाण मोठे असून ही कामे मोबाईलवरून तातडीने करावी लागतात. त्यासाठी वाय-फाय सुविधेची आवश्यकता असताना अनेक ठिकाणी वाय-फाय उपलब्ध नसल्याची समस्या त्यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. वृषाली आरु, डॉ. आरती ढापसे, डॉ. शिल्पा चेलवा, सुमित जाधव यांच्यासह आरोग्य सेविका व आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संस्कृती व खाद्यपदार्थांची रेलचेल; विविध सांस्कृतिक स्पर्धा

# ओणम फेस्टिव्हलमधून केरळच्या संस्कृतीचे दर्शन

**समाचार/नगर-दि.५**



अहिल्यानगर केरळ समाजाच्या वतीने आयोजित ओनम फेस्टिव्हल उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. केरळच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह पारंपरिक केरळी खाद्यपदार्थांची रेलचेल यावेळी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे केरळी समाजासोबतच मराठी बांधवांनीही या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेत केरळच्या संस्कृतीचा आणि खाद्यपरंपरेचा मनसोक्त आनंद घेतला. विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करून विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. ओनम फेस्टिव्हलचे उद्घाटन धनश्री विखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धनश्री विखे म्हणाल्या की, भारत हा विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतींनी नटलेला देश आहे. सण-उत्सव साजरे करताना आपण कधीही एकमेकांमध्ये भेदभाव करत नाही. सर्वजण एकत्र येऊन मोठ्या उत्साहाने सण-उत्सव साजरे करतात आणि त्यातून आपल्या संस्कृतीचा वारसा शिकायला मिळतो.

आपली जात, देव आणि भाषा वेगळी असली तरी आपण सर्व भारतीय एकच आहोत. मात्र, नव्या पिढीमध्ये आपल्या महान संस्कृतीचा वारसा आणि इतिहास जाणून घेण्याबाबत काहीसा बदल दिसून येत आहे. त्यामुळे नवीन पिढीला आपल्या संस्कृतीची आणि इतिहासाची ओळख करून देणे गरजेचे आहे. सर्वांनी भारतीय सण एकत्रित येऊन मोठ्या उत्साहात साजरे केले पाहिजेत. आज भारतीय सण-उत्सव परदेशातही मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहेत.

यावेळी बाबुशेठ टायरवाले म्हणाले की, अहिल्यानगर शहरात केरळ समाजाचा ओनम उत्सव गेल्या ४० वर्षांपासून मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या उत्सवात मोठ्या संख्येने मराठी बांधवांनाही सहभागी करून घेतले जाते.केरळी समाज अहिल्यानगर जिल्ह्यात आल्यानंतर मराठी तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असून हजारो तरुण आमच्याकडे काम करीत आहेत. सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांवर संकट आले की केरळी बांधव मदतीचा हात पुढे करतात. समाजासाठी जे आवश्यक आहे, ते काम करण्याचा आम्ही प्रयत्न करतो.

वसंत सिंग यांनीही मनोगत व्यक्त केले. धनश्री विखे यांच्यासह उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, नगरसेवक तसेच मराठी बांधवांनी केरळच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा मनसोक्त आस्वाद घेतला. ओनम फेस्टिव्हलमध्ये परंपरा आणि आपुलकीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, माजी महापौर सुरेखा कदम, बाबुशेठ टायरवाले, नगरसेवक नवनाथ कातोरे, शाम नळकांडे, करण कराळे, सुदर्शन, राजू लक्ष्मण, सत्येन, कुरेन, उदयकुमार केरळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय जैन महासंमेलन उत्साहात

# प्रशासन, राजकारणात जैनांचा टक्का वाढला पाहिजे – आनंद भंडारी



**समाचार/नगर-दि.५**

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पुण्यभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात रविवारी अहिल्यानगर जिल्हास्तरीय जैन महासंमेलन झाले. जिल्ह्यातील सर्व श्रावक संघांनी यात सहभागी होऊन समाजासमोरील आव्हाने, विविध प्रश्नांचा उहापोह केला. गुरूदेवांच्या आशीर्वादाने नगर जिल्ह्यात मजबूत संघ व्यवस्था निर्माण करून जैनिझमची पाळेमुळे अधिक घट्ट करण्याचा निर्धार या महासंमेलनात करण्यात आला.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यातील चातुर्मासात झालेल्या या महासंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते. यावेळी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य, महासंमेलनाचे आयोजक अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनचे संजय गुगळे यांनी प्रस्ताविक केले. प्रमोद सोळंकी, अनिल गांधी, कमलेश गुंदेचा, ताराचंद डुंगरवाल, प्रणित मुथा, संकेत गुगळे आदी पदाधिकारी,डॉ. स्मिता आनंद भंडारी, नूतन गुगळे, उल्का सोळंकी, माया धोका, उपस्थित होते.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, राखी बोरा, प्रमिला बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

प्रारंभी प्रवीणऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सात व्यसनांपासून मुक्त होण्यासाठी सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली.

प्रवीणऋषीजी महाराज मार्गदर्शनात म्हणाले, समाजात आंतरजातीय विवाह वाढत आहे. इतर समाजातून जैन परिवारात येणाऱ्या महिलांना जैन परंपरा शिकवल्या तरच पुढच्या पिढीला जैनिझम कळू शकेल. ही समाजाच्या अस्तित्वाची लढाई आहे. आपल्यात प्रशासनात काम करणारे आनंद भंडारी यांच्यासारखे बुद्धिजीवी आहेत. त्यांना नगर जिल्ह्यातील समाजाने मार्गदर्शक म्हणून निवडावे. ग्रामीण भागात जैन परिवार कमी होत आहेत. त्यांच्या उन्नतीसाठी संघाने ठोस कार्यक्रम हाती घ्यावा.

जिल्ह्यातील श्रावक संघांनी धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता आपले सामर्थ्य समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीसाठी वापरले पाहिजे. गुरुदेवांच्या भूमीतील संघ एकजूट, सामर्थ्यवान, शक्तीशालीच हवा. सीईओ आनंद भंडारी म्हणाले, ज्या धर्माने अहिंसा, अपरिग्रह, संयम, करूणा, तप अशी महान शिकवण दिली त्या जैन धर्माचे आपण सर्व वाहक आहोत. अहिंसेचे स्वरूप व्यापक आहे. ते फक्त शाकाहारापुरते मर्यादित नाही. महात्मा गांधी यांची सर्व आंदोलने ही अहिंसा तत्वावरच होती. मात्र आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत.

प्रशासन, राजकारणात जैनांचा टक्का वाढला पाहिजे. या गोष्टींनी खूप मोठे बदल निश्चित होऊ शकतात. संघटीत समाजच समस्येवर चांगले उत्तर शोधू शकतो. या महासंमेलनातून जैन धर्माचा आचारविचार रूजवण्याचा प्रयत्न व्हावा. युवा पिढी प्रश्न विचारणारी आहे. त्यांना त्यांच्या भाषेत उत्तरे दिली पाहिजे, त्यांना नेतृत्वाची संधी दिली पाहिजे. आज चातुर्मासात युवा वर्ग समाजाच्या परंपरांशी स्वतः ला जोडत आहे. हे अतिशय सकारात्मक चित्र आहे. यातूनच जैन समाजाचे भविष्य उज्वल आहे.

अशोक बोरा यांनी सांगितले की, आज गुरूदेवांच्या आदेशाने जिल्हास्तरीय जैन महासंमेलन होत आहे. जिल्हाभरातून आलेल्या जैन बांधवांना गुरूदेवांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले आहे. त्यांचे आशीर्वाद सर्वांसाठी कृपा वर्षाव आहे. आभार प्रदर्शन कमलेश गुंदेचा यांनी केले.



अॅडव्हान्स बुकिंग सुरू
my cinema
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show - 5/10/2026 to 8/10/2026
DRISHYAM : THE CONCLUSION - 8:30, 9:30, 10:15, 11:15 am, 1:00, 2:00, 2:45, 3:45, 4:35, 5:30, 6:30, 8:10, 9:15, 10:00, 10:45 pm,
HANUMAN ANSH- 2:45, 5:30 pm,
PREM KEETANU (Hindi) - 12:15, 8:15 pm,
THE VYAAN FORCE OF THE... - 9:45 am, 7:30, 10:45 pm,
AALI MOTHI SHAHANI - 12:15pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८११५११७/ ९८२२०८१४४०



## श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अहिल्यानगर माणिकनगर, अहिल्यानगर

(फक्त सभासदांसाठी – नम्र सूचना)

**श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अहिल्यानगर** या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण (जनरल मिटींग) सभा, **रविवार दि.२५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता**, संस्थेचे '**सॉलिटेअर बाय बडीसाजन**', **दौंड रोड, अहिल्यानगर** येथे आयोजित केली आहे.

या सभेचे निमंत्रण पत्र (अजेंडा) सर्व सभासदांना पाठविण्यात आले आहे, तथापि नजरचुकीने ज्या सभासदांना निमंत्रण पत्र मिळाले नसेल त्यांनी कृपया सभेस येण्याचे करावे.

**टीप** : सभासदांसाठी संस्थेचा ताळेबंद व इतर माहिती प्रत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. यावरील आपले मत किंवा काही सूचना असल्यास संबंधितांनी लेखी स्वरूपात संस्था कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

दि.२५/०९/२०२६
अहिल्यानगर

विशाल मूळचंद शेटिया
सेक्रेटरी
श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अहिल्यानगर




घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा
वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)
स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर
9011020176
9011026483
7499980845
(सहयोग - स्नेहालय)



जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
N.A.B.H. (Full Accredited) & ISO 9001:2015 Hospital
मोफत दंतरोग तपासणी व जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबीर

शुक्रवार - दि. ०९-१०-२०२६ * वेळ : सकाळी १० ते २
मेटलकॅप 1000/-
सिरॅमिक कॅप 2000/-, 2500/-
रूट कॅनल 2100/- ते 3000/-
दात साफ करणे (Scaling) 500/- पासुन पुढे..
दातांची कवळी बसवणे – (4 Types Denture) 8,000/-, 10,000/-,14,000/- 20,000/-
* औषध खर्च वेगळा
दातामध्ये सिमेंट भरणे 500/- पासुन पुढे..
इम्प्लांट 13500/- पासून सुरु

तज्ञ डॉक्टर्स
पूर्णवेळ दंतविकार तज्ञ – डॉ. अर्पणा पवार ( सकाळी १० ते ४ ) * डॉ. प्राची गांधी. (संध्या. ५ ते ८ )
ऑर्थोडेंटिस्ट – डॉ. कोमल ठाणगे * डॉ. अश्विनी बालगुडे * डॉ.राजलक्ष्मी राय
पिडियाट्रिक डेंटिस्ट – * डॉ. प्रणव डुंगरवाल * डॉ. तृप्ती डुंगरवाल
पेरीओ डेंटिस्ट – डॉ. सुप्रिया कवडे * एन्डो-डेंटिस्ट – डॉ. पूजा गायकवाड
प्रोस्थो डेंटिस्ट – डॉ.पारितोष वारे * ओरल सर्जन – डॉ.स्वराज ठोले
* मॅक्सिलोफेशिअल सर्जन – डॉ. मृदुला मुळे
स्माईल ट्रेन प्रकल्पांतर्गत जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
महावीर भवन – रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/-
सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह रू. 950/-
सिटीस्कॅन रू. 1250/-
एम.आर.आय. रू. 2500/-
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com


## नगरमध्ये २४, २५ ऑक्टोबरला होणार संमेलन

# संत साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण



**समाचार/नगर-दि.५**

शासनाच्या मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने नगरमध्ये दि. २४ व २५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाच्या आकर्षक बोधचिन्हाचे अनावरण उत्साहात झाले. या वैशिष्ट्यपूर्ण बोधचिन्हात संतपरंपरेचे प्रतीक ध्यानस्थ संत ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानाचा प्रकाश देणारी ज्योत व लेखणी, तसेच ज्ञान, संस्कृती आणि साहित्यपरंपरेचा प्रतिक असलेला ग्रंथ याचा समावेश असल्याने संतविचारातून ज्ञान, ज्ञानातून साहित्य आणि साहित्यातून समाजप्रबोधन हे या बोधचिन्हाचे वैशिष्ट्य आहे.

या कार्यक्रमात साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धर्माचार्य प्रमुख सतीश उर्फ आबा मुळे यांची तर सह स्वागताध्यक्षपदी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाच्या मराठी भाषा विभाग व साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आर्थिक योगदानातून होणाऱ्या या संत साहित्य संमेलनाचे नियोजन सुरु झाले आहे. नागरिकांना दोन दिवस विविध साहित्यिक उपक्रमांची अनोखी मेजवानी मिळणार आहे, अशी माहिती संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर यांनी दिली.

या कार्यकामास प्रमुख पाहुणे उद्योजक राजकुमार जोशी, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे, संमेलांचे सचिव संजय खेले, आर्टिस्ट प्रनील लासुरे यांच्यासह श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचे साधक उपस्थित होते. या बैठकीत संत साहित्य संमेलांच्या कार्यवाहपदी दत्तात्रय भालेराव, सहसचिवपदी गजेंद्र गाडगीळ, स्वागत संयोजक प्रा डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व व्यवस्थाप्रमुख राजू रिक्कल यांच्यासह विविध समित्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. राजकुमार जोशी म्हणाले, आपल्या अहिल्यानगर जिल्ह्याला संतांची खूप मोठी ऐतिहासिक व वैभवशाली परंपरा लाभली आहे. हे आपले भाग्य आहे. या सर्व संतांचे विचार व कार्य आजही आल्याला मार्गदर्शक आहेत. संत साहित्य संमेलनाच्या माध्यमातून या सर्व महान संतांच्या विचारांचा जागर होणार आहे. या पर्वणीचा सर्वांनी लाभ घ्यावा.

स्वागताध्यक्ष आबा मुळे यांनी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे तसेच यानिमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये सर्व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय खेले यांनी केले. प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांनी आभार मानले.



Arun Butterscotch
Milk & Cream Icecream Product
HATSUN Daily
प्रोप्रा : किशोर मुदगल | डी-१२, एमआयडीसी अहमदनगर | 7219515144



## ग्रामपंचायत चापडगांव, ता. कर्जत, जि.अहिल्यानगर

**जाहीर निविदा सुचना**

खालील कामांच्या बी-१ निविदा दोन लिफाफा पद्धतीने ग्रामपंचायत चापडगांव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर च्या वतीने योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदारांकडून माघविण्यात येत आहे. कामाबाबत निविदा अटी व शर्ती इत्यादी बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून कोऱ्या निविदा संच दि. ०५/१०/२०२६ ते दि.१२/१०/२०२६ पर्यंत सकाळी १० ते ४ या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्ष भरणा करून उपलब्ध आहे. परिपुर्ण भरलेल्या निविदा वरील कालावधीतच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा दि.१३/१०/२०२६ रोजी शक्य झाल्यास सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. निविदासंदर्भात सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालयात पहावयास मिळेल. प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तथा निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | निविदा रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी | वर्ग | लेखाशिर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौंजे चापडगाव ता कर्जत येथे व्यापारी गाळे (२) दुरुती करणे | १,९३,३४९.०० | सुट | २३६/- | सुबे | ग्रामनिधी २०२६-२०२७ | ६ महिने |

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत चापडगांव, ता. कर्जत, जि.अहिल्यानगर



## ग्रामपंचायत कार्यालय न.पा.वाडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

**निविदा नोटीस (प्रपत्र-१)**

जाहीर निविदा अंतर्गत निविदा सूचना क्र. ग्राप/वर्ग म.स.सं./०१/कॉल-१/सन २०२६-२७ दिनांक : ०५/१०/२०२६

१. नोंदणीकृत मजूर संस्था /सु.बे. नोंदणीकृत अभियंता/विक्रेत्याकडून **ग्रामपंचायत कार्यालय न.पा.वाडी, ता. राहाता, जि.अहिल्यानगर** येथे पुढील काम परसेंटेज (टक्के) दराने घ्यायचे आहे. कामाचा तपशील पुढे दिलेला आहे. २. सदर कामाचे कोरे निविदा अर्ज दि. ०५/१०/२०२६ ते ११/१०/२०२६ या कालावधीत **ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी न.पा.वाडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर** यांच्या कार्यालयात सकाळी १०.०० ते सायं.५.०० कार्यालयीन कामाच्या वेळेत (सर्व सुट्टी वगळून) मिळतील. ३. निविदा दि. १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० नंतर उघडल्या जातील. ४. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार व उशिरा आलेले कोणतेही दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त व त्रुटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत रु. | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे न.पा. वाडी ता. राहाता येथे गावाअंतर्गत बंदिस्त गटार करणे | १५ वा वित्त आयोग ग्रा. पं. स्तर | २९६२९५/- | सूट | २४०/- | सु.बे. |
| २. | मौजे न.पा.वाडी ता. राहाता येथे गावाअंतर्गत भुमिगत गटार करणे | १५वा वित्त आयोग ग्रा. पं. स्तर | ४३५६३/- | सूट | २४०/- | सु.बे. |
| ३. | मौजे न.पा. वाडी ता. राहाता येथे ड्रेनेज वाहिनीची दुरुस्ती करणे | १५वा वित्त आयोग ग्रा. पं. स्तर | १६९३५९/- | सूट | २४०/- | सु.बे. |

**टीप** – निविदा संबंधी अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. निविदा व अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदे पैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच
ग्रामपंचायत न.पा. वाडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर



टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.०२/१०/२०२६ ते दि.०८/१०/२०२६



| | |
|---|---|
| DRISHYAM THE CONCLUSION (हिंदी) | |
| 08.00 AM | 09.00 AM |
| 10.00 AM | 10.45 AM |
| 11.45 AM | 01.30 PM |
| 02.30 PM | 04.00 PM |
| 04.15 PM | 05.15 PM |
| 07.00 PM | 08.00 PM |
| 09.15 PM | 09.45 PM |
| 10.15 PM | 10.45 PM |
| PREM KEETANU (हिंदी) | |
| 10.45 AM | 06.40 PM |
| ALI MOTHI SHAHANI (मराठी) | |
| 03.55 PM | |
| THE VVAAN - FORCE OF THE FOREST (हिंदी) | |
| 08.00 AM | 01.20 PM |
| HANUMAN ANSH (हिंदी) | |
| 01.00 PM | 07.00 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book show | CONNPLEX | AVAILABLE ON book show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002



## अहमदनगर शहर सहकारी बँक लि., अहमदनगर

मुख्य कार्यालय : 'सर्वार्थ' नवीपेठ, अहिल्यानगर- ४१४००१
फोन नं. : (०२४१) २३४६२१७, २३४३३५७, २३५४३६४
E-mail : centraloffice@shaharbank.com Website : www.shaharbank.bank.in

## विक्रीसाठी मोहोरबंद फेरनिविदा नोटीस

खालील मालमत्ता ही दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ कायद्यानुसार 'जशी आहे जेथे आहे तशी व तेथे जी काय आहे तशी रिकोर्स विरहीत' या तत्त्वावर विक्रीसाठी मोहोरबंद निविदा मागवित आहोत.

| कर्जदार/मालमत्ता धारक व जामीनदारांचे नाव | स्थावर मालमत्तेचा तपशील | कर्जदाराकडील येणे बाकी |
|---|---|---|
| १) श्री. विशाल संजय वालकर, प्रोप्रायटर वालकर सराफ, रा. सराफ बाजार, गंजबाजार, अहिल्यानगर २) श्री. कुणाल संजय वालकर, रा. शिवाजी हौसिंग सोसायटी, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर ३) श्री. राजेश श्रीकिसन मिरांडे, रा. टीनगल्ली, सराफ बाजार, गंजबाजार, अहिल्यानगर ४) श्री. अभिषेक राजेंद्र वालकर, रा. सराफ बाजार, गंजबाजार, अहिल्यानगर | श्री. विशाल संजय वालकर व श्री. कुणाल संजय वालकर यांचे नावावरील मिळकत डि।। अहमदनगर सब डि।। तालुका नगरपैकी शहर नगर येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचा सि. स. नं. ३०६१अ चे क्षेत्र १०१.८० चौ.मी. यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे – पूर्वेस: सि. स. नं. ३०६३ व गल्ली; दक्षिणेस: सि. स. नं. ३०६३ व ३०६४; पश्चिमेस: रस्ता; उत्तरेस: सि. स. नं. ३०६० – येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत व त्यावर यापुढे वेळोवेळी होणारे बांधकाम, त्यातील सर्व तदंगभूत वस्तूसहित वागणुकीचे, वहिवाटीचे, इजमेंटचे सर्व हक्कांसहित काही एक राखून न ठेवता दरोबस्त. | दि. ०५.०२.२०१९ रोजी मागणी नोटीस पाठवून दि. ३१.०१.२०१९ अखेर रक्कम रु. ७,३८,६९,३९७.४० (अक्षरी रुपये सात कोटी अडोतीस लाख एकोणसत्तर हजार तीनशे सत्याण्णव पैसे चाळीस मात्र) व दि. ०१.०२.२०१९ पासून होणारे व्याज, दंडव्याज व खर्च |

- **राखीव किंमत** : रु. २,८९,९४,५६३/- बयाणा रक्कम (राखीव किंमतीच्या १०%) रु. २८,९९,५००/-
- **निविदा विक्री फॉर्म किंमत** : रु. १००/- विना परतावा.
- **मिळकत पाहणी तारीख व वेळ** : दि. १५/१०/२०२६ ते दि. १७/१०/२०२६ बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत
- **निविदा विक्री तारीख व वेळ** : दि. ०५/१०/२०२६ ते दि. २२/१०/२०२६ बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत.
- **निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख** : दि. २२/१०/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात.
- **निविदा उघडण्याची तारीख व वेळ** : शुक्रवार, दि. २३/१०/२०२६ सकाळी ११.३० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयात.
- **ठिकाण** : अहमदनगर शहर सहकारी बँक लि., अहमदनगर मुख्य कार्यालय, 'सर्वार्थ', नवीपेठ, अहिल्यानगर
  **दूरध्वनी क्रमांक** : ०२४१-२३४६२१७, २३४३३५७
- **अटी व शर्ती बँकेच्या मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.**

दि. ०५/१०/२०२६ शिक्का

अधिकृत अधिकारी
अहमदनगर शहर सहकारी बँक लि., अहमदनगर